रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ४४
www.ramprahar.com
रविवार, ३१ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

मुरूडमधील कोर्लई गावात विवाहितेची आत्महत्या/२
श्रीवर्धन बसस्थानकात साचले पाणी/५
गणेशोत्सवात घरोघरी भजनाचे सूर/७

## उपराजधानी नागपूरमध्ये ओबीसी समाज एकवटला



**नागपूर :** राजधानी मुंबईत मराठ्यांचे बेमुदत उपोषण सुरू झाल्यानंतर तिकडे उपराजधानी नागपूरमध्ये ओबीसी समाज एकवटल्याचे पहायला मिळाले. राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या साखळी उपोषणाला शनिवार (दि. ३०)पासून सुरुवात झालीय. नागपूरच्या संविधान चौकात हे उपोषण सुरू झाले असून ओबीसींच्या आंदोलनालाही लोकप्रतिनिधींसह ओबीसी बांधवांचा चांगला प्रतिसाद मिळतोय. नागपूरचे भाजप आमदार आशिष देशमुख यांनी ओबीसी महासंघाच्या आंदोलनाला सक्रिय पाठिंबा दर्शवला आहे, तर काँग्रेसचे गडचिरोलीचे खासदार नामदेव किरसान यांनीही या आंदोलनात सहभागी होत ओबीसी आरक्षणाला पाठिंबा दिला. ओबीसी महासंघाने दिलेले निवेदन परिणय फुकेंनी सरकारचा प्रतिनिधी म्हणून स्वीकारले. ओबीसींच्या मागण्या आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत पोहचवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# हैदराबाद गॅझेट लागू करण्यास तत्वतः मंजुरी

## ■ सरकारचा मोठा निर्णय; माजी न्या. शिंदेंची मनोज जरांगेंशी चर्चा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाचा आरक्षण प्रश्न सोडवण्यासाठी नेमलेल्या उपसमितीच्या शनिवारी (दि.३०) झालेल्या बैठकीनंतर मनोज जरांगे-पाटील यांच्या भेटीसाठी सरकारचे शिष्टमंडळ पाठवण्यात आले होते. या चर्चेवेळी माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांनी मनोज जरांगे यांना सांगितले की, राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्यास तत्वतः मंजुरी दिली आहे. त्यावरील जरांगे यांच्या सूचना घेऊन शिंदे समितीचे सदस्य मंत्रिमंडळ उपसमितीची भेट घेणार आहेत.



मराठा आरक्षणासाठी गठीत केलेल्या निवृत्त न्यायमूर्ती शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समितीचे सदस्य आणि काही सनदी अधिकाऱ्यांनी मराठा आरक्षणाची मागणी घेऊन मुंबईतील आझाद मैदानात बेमुदत उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन चर्चा केली. शिंदे यांनी जरांगे यांच्याबरोबरच्या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. ते म्हणाले, काही प्रमाणात जरांगे यांचे समाधान झाले आहे. त्यांनी दिलेल्या सूचना मंत्रिमंडळ उपसमितीपुढे आम्ही मांडणार आहोत. काही गोष्टींना सरकारने तत्वतः मान्यता दिली आहे. त्यावरील जरांगे यांचे मत सकारला सांगू. त्यानंतर मंत्रिमंडळ पुढील निर्णय घेईल. सध्या सरकारने हैदराबाद गॅझेटला तत्वतः मान्यता दिली आहे.

मराठा, कुणबी एकच आहे याबाबत सरकारने अधिसूचना काढावी, अशी मनोज जरांगे पाटील यांची मागणी आहे. या संदर्भातील निर्णय होऊ शकतो का? या प्रश्नावर उत्तर देताना संदीप शिंदे म्हणाले, सध्या हैदराबाद संस्थानच्या गॅझेटबाबत निर्णय घेण्यात आला आहे. यावर मी आणखी काही सांगू शकत नाही. मंत्रिमंडळ त्यावर निर्णय घेईल.



## भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू यांना जीवे मारण्याची जाहीरपणे धमकी

### शेकापच्या राजेंद्र पाटील यांच्यावर कायदेशीर कारवाईची मागणी; पोलिसांना निवेदन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नेहमीच दादागिरीची भाषा करून अनेक जणांना धमकी देणाऱ्या शेकापच्या राजेंद्र पाटील यांच्याविरोधात भाजपचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू यांनी शनिवारी (दि. ३०) पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे. नुकताच शेतकरी कामगार पक्षाचा पदाधिकारी नियुक्तीपत्र वाटप कार्यक्रम पनवेलमध्ये झाला. या कार्यक्रमात राजेंद्र पाटील यांनी शेकापच्या व्यासपीठावरून आणि आपल्या भाषणातून गणेश कडू यांना जीवे मारण्याची जाहीर धमकी दिली होती.

राजेंद्र पाटील यांनी केलेल्या गंभीर वक्तव्याने गणेश कडू यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. आपल्या जीवितास झालेल्या धोक्यामुळे गणेश कडू यांनी अखेर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या संदर्भात त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांना निवेदन दिले आहे. या वेळी त्यांच्यासोबत आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, **(पान २ वर..)**

## आंदोलनातील तरुणाचा मृत्यू


**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे यासह इतर मागण्यांसाठी मनोज जरांगे-पाटील यांचे मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषण सुरू आहे. दरम्यान, आंदोलनात सहभागी झालेल्या लातूरमधील एका मराठा आंदोलकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. विजय घोगरे असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे.

मृत तरुण हा लातूर जिल्ह्याच्या अहमदपूर तालुक्यातील टाकळगाव येथील आहे. त्याला उपचारासाठी जेजे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, पण डॉक्टरांनी मृत घोषित केले.

## लालबागच्या राजाचे दर्शन

**मुंबई :** केंद्रीय गृह तथा सहकारमंत्री अमित शाह आणि आयसीसीचे अध्यक्ष जय शाह दरवर्षीप्रमाणे यंदाही मुंबईतील गणेशोत्सवात सहभागी झाले. या वेळी त्यांनी लालबागच्या राजाचे सहकुटुंब दर्शन घेतले आणि मनोभावे पूजन केले. सोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री आशिष शेलार, मंगलप्रभात लोढा, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मुंबई अध्यक्ष अमित साटम आदी मान्यवर उपस्थित होते.



## निवडक

### वाल्मिक कराडचा जामीन अर्ज फेटाळला

**बीड :** जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात मुख्य आरोपी असलेल्या वाल्मिक कराडचा तुरुंगातील मुक्काम आणखी वाढला आहे, कारण जिल्हा व विशेष सत्र न्यायालयात शनिवारी (दि. ३०) झालेल्या सुनावणीत कराडचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला आहे. त्यामुळे तुरुंगातून त्याची सुट्टी नाही, हे स्पष्ट झाले आहे.

### 'ऑपरेशन सिंदूर'च्या हल्ल्याचे नवे व्हिडीओ जारी

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय हवाई दलाने केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'चे नवे व्हिडीओ आणि तपशील एनडीटीव्ही डिफेन्स समिटमध्ये सादर करण्यात आले. हवाई दलाचे उपप्रमुख एअर मार्शल नर्मदेश्वर तिवारी यांनी हल्ल्याचे नियोजन, अंमलबजावणी आणि परिणामांबद्दल सविस्तर माहिती दिली.

## कंपनी मोठी होण्यासाठी कर्मचाऱ्यांचा विश्वास महत्त्वाचा

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन; टीआयपीएल सन्मान सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोणतीही कंपनी मोठी व्हायची असेल, तर त्यासाठी कर्मचाऱ्यांचा विश्वास महत्त्वाचा असतो. टीआयपीएल कंपनीमधील अधिकारी आणि कर्मचारी तो विश्वास सिद्ध करून जीव तोडून काम करतात. म्हणून तुमचे अभिनंदन करतो, असो गौरवोद्गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळ्यावेळी काढले.



दानशूर व्यक्तिमत्व असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्या पार्श्वभूमीवर टीआयपीएल अर्थात ठाकूर इन्फ्राप्रोजेक्टस् प्रा.लि. कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेमध्ये उज्वल यश संपादित केलेल्या पाल्यांचा सत्कार सोहळा शनिवारी (दि. ३०) खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी ते बोलत होते.

या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, टीआयपीएलचे डायरेक्टर अमोघ ठाकूर, एम.पी. त्यागी, सी.एस. भरणीकुमार, चीफ अकाउंटट अरुण नाईक यांच्यासह कंपनीचे कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी, आतापासून दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला जाईल. टीआयपीएलमधील कर्मचाऱ्यांच्या मुलांना पुढील शिक्षणासाठी कंपनी मदतदेखील करेल तसेच त्यांना जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या महाविद्यालयांमध्ये ५० टक्के फी माफी देण्याचे या वेळी जाहीर केले.

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, आपण जो शब्द देतो तो पाळतो हा विश्वास कंपनीच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली निर्माण केला आहे, तर माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सध्याचे युग हे स्पर्धेचे आहे. अशा वेळी जेवढे महत्त्व परीक्षांमधील गुणांना आहे तितकेच व्यक्तिमत्व विकासालाही आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्त्व विकासावरही भर द्यावा, असे आवाहन केले. **(पान २ वर..)**

## सात वर्षांनंतर पंतप्रधान मोदी चीनमध्ये दाखल

**बीजिंग :** टॅरिफच्या मुद्द्यावरून भारत आणि अमेरिकेमधील संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला असतानाच दुसरीकडे चीन-आणि भारतामधील संबंधांमध्ये सुधारणा होत असल्याचे पहायला मिळत आहे. तब्बल सात वर्षांनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी चीनच्या तिआंजिनमध्ये दाखल झाले आहेत.

शांघाय सहकार्य संघटनेची ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रोजी चीनमधील तिआंजिनमध्ये बैठक होणार असून या बैठकीत पंतप्रधान मोदी सहभागी होणार आहेत. शांघाय सहकार्य संघटनेची आतापर्यंतची ही सर्वांत मोठी बैठक असून पंतप्रधान मोदींसह रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन हेदेखील उपस्थित असणार आहेत. त्यामुळे या बैठकीकडे अवघ्या जगाचे लक्ष लागलेले आहे. ट्रम्प यांनी भारतावर लादलेल्या अतिरिक्त टॅरिफदरम्यान भारतासाठी पंतप्रधान मोदींचा हा चीन दौरा महत्त्वाचा ठरण्याची शक्यता आहे.

## आज गौराई येणार सोनपावलांनी...



**मुरूड : प्रतिनिधी**

गणपती बाप्पांच्या यथासांग प्रतिष्ठापनेनंतर आता गौराई येण्याची प्रतीक्षा संपणार असून रविवारी (दि. ३१) थाटामाटात गौराईचे आगमन होणार आहे. यासाठी महिला सज्ज झाल्या आहेत.

गौरीच्या स्वागतासाठी घराघरात महिलांची लगबग सुरू झाली आहे. भारतीय संस्कृती, परंपरांमध्ये तसेच समाजजीवनात गौरी हे शिवाच्या शक्तीचे आणि गणेशाच्या आईचे रूप मानले गेले आहे. अनेक ठिकाणी याला महालक्ष्मी पूजन असेही संबोधले जाते. गौरी पूजनासाठी लागणारे साहित्य घेण्यासाठी शनिवारी बाजारपेठेत गर्दी झाली होती.

गौरीचे वैशिष्ट्यपूर्ण मुखवटे, असंख्य प्रकारचे दागिने, साड्या आणि सजावट साहित्याने सजलेल्या बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी महिलांची दिवसभर वर्दळ दिसून आली.

गौरींचे आवाहन करताना घराच्या उंबऱ्यातून आत आणताना जिच्या हातात गौरी असते तिचे पाय दुधाने धुऊन कुंकवाने स्वस्तिक काढतात. घरात प्रवेश करताना दरवाज्यापासून पूजा होणाऱ्या जागेपर्यंत लक्ष्मीच्या पावलांचे ठसे उमटवले जातात. काही ठिकाणी तेरड्याच्या रोपांना मुखवटा लावून गौरीची प्रतिमा सजवली जाते, तर काही भागात लाकडी किंवा मातीच्या मूर्तींना साडी व दागिने नेसवून नटवले जाते.

गौरी पूजनाच्या दिवशी कोकणात ओवसा पद्धत केली जाते. सुवासिनी गौरीला वाण देतात. रात्री गौरीचे जागरण केले जाते. यावेळी झिम्मा-फुगडीच्या खेळाने वेगळीच रंगत येते.

यंदा गौरी आवाहन रविवारी ३१ ऑगस्ट रोजी होईल. त्यानंतर १ सप्टेंबर रोजी ज्येष्ठा गौरी पूजन होईल. सकाळी ५.५९ ते संध्याकाळी ६.४३ या वेळेत पूजेचा शुभ मुहूर्त आहे, तर २ सप्टेंबर रोजी गणपतीसोबत गौरींचे विसर्जन केले जाईल.



दै. रामप्रहर आणि मल्हार चॅनेलसोबत यंदाचा गणेशोत्सव साजरा करा...

गणेशोत्सव बुधवार, दि.27 ऑगस्टपासून सुरू झाला आहे. या पर्वणीत आपल्या गणपतीचा फोटो दै. रामप्रहर आणि मल्हार चॅनेलवर **विनामूल्य** प्रसिद्ध करण्यात येत आहे. त्यामुळे आपण आपल्या बाप्पाचा फोटो, सोबत **आपले नाव व पत्ता ramprahar@gmail.com या ई-मेल आयडीवर पाठवा.** फोटो चांगला असल्यास त्याला रामप्रहर आणि मल्हार चॅनेल या दोन्ही ठिकाणी विनामूल्य प्रसिद्धी देण्यात येईल.

राम प्रहर
दिवाळी २०२५
मुक्तछंद

मुक्तपणे व्यक्त होणारे विविध विषयांवरील लेख, कथा, कविता, व्यंगचित्र आणखी बरेच काही आपण यंदाच्या दिवाळी अंकात मांडणार आहोत. लेख आणि कथा यांना शब्दमर्यादा असेल ती सुमारे तीनशे ते पाचशे शब्दांपर्यंत. संपादक मंडळाला जे साहित्य सर्वार्थाने योग्य वाटेल त्याच साहित्याला प्रसिद्धी दिली जाईल. आपला मजकुर टाईप केलेली ओपन फाईल सोमवार, १५ सप्टेंबर २०२५पर्यंत दै. रामप्रहरच्या मेलवर पोहचणे आवश्यक आहे. हाताने लिहिलेले साहित्य स्वीकारले जाणार नाही.
चला तर लागूया कामाला...

ramprahar@gmail.com

## निवडक

### कारच्या धडकेत स्कूटीचालक जखमी

**पनवेल :** चार चाकी कारने स्कुटीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात २६ वर्षीय रोहन बेहरा जखमी झाला. या अपघाताप्रकरणी २६ ऑगस्ट रोजी खारघर पोलीस ठाण्यात कारचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. रोहन बेहरा हा २५ ऑगस्ट रोजी स्कुटी क्रमांक एम एच ४६ सीटी ८०७३ घेऊन सेक्टर २०, मच्छी मार्केट येथे सामान आणण्यासाठी जात होता. या वेळी चार चाकी गाडीने त्याच्या स्कुटीला धडक दिली. यात तो खाली पडला आणि जखमी झाला.

### मोटरसायकल चोरली

**पनवेल :** रेल्वे स्टेशनबाहेरील मोकळ्या जागेत उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. धनंजय पांढरकर यांनी त्यांची १५ हजार रुपये किमतीची बजाज कंपनीची निळी डिस्कवर मोटरसायकल (एमएच ०२ बीई २२१६) ही पनवेल रेल्वे स्टेशन बाहेरील मोकळ्या जागेत उभी करून ठेवलेली मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आलेली आहे.

### जनरेटरची केली चोरी

**पनवेल :** मुंबई–गोवा हायवे रोडच्या कडेला अन्नपूर्णा हॉटेलसमोर उभ्या केलेल्या ट्रकच्या केबिनमध्ये लोखंडी ग्रीलमध्ये लॉककरून ठेवलेले जनरेटर अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. २५ हजार रुपये किमतीचा होंडा कंपनीचा लाल रंगाचा जनरेटर उभ्या केलेल्या ट्रकच्या केबिनमध्ये लोखंडी ग्रीलमध्ये लॉककरून ठेवलेले असताना अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आलेली आहे.

# सेझग्रस्त शेतकऱ्यांनी घेतली आमदार महेश बालदींची भेट

**उरण : वार्ताहर**

उरण, पेण व पनवेल तालुक्यातील सेझग्रस्त शेतकऱ्यांनी एस. ई. झेड. कंपनीने अन्याय पद्धतीने घेतलेल्या जमिन मिळकती परत मिळवुन देण्याकरीता सेझग्रस्त शेतकऱ्यांनी शनिवारी (दि.३०) उरणचे आमदार महेश बालदी यांची भेट घेतली.



कंपनीने खरेदी केलेली जमिन मिळकत १५ वर्षात न वापरल्यामुळे मार्च २०२२ पासुन ५२३ शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी रायगड यांजकडे जमीन मिळकती परत करण्याकरता उरण, पेण, पनवेल तालुक्यातील शेतकऱ्यांतर्फे ॲड. दत्तात्रेय नवाळे यांनी चौकशी अर्ज दाखल केले. त्यावर अंतीम सुनावणी होऊन आत्ता प्रकरण अंतीम आदेशाकरीता ठेवण्यात आले आहे.

या विषयी पेण तालुक्याचे आमदार मा.रवी पाटील साहेब यांनी सेझग्रस्त शेतकऱ्यांची महसुलमंत्री बावनकुळे यांच्या बरोबर २/०४/२०२५ रोजी मंत्रालयात भेट घडवुन आणली होती. त्यावेळी बावनकुळे साहेब यांनी जिल्हाधीकारी रायगड यांना एस.ई.झेड. करीता संपादीत केलेल्या जमिन मिळकती विषयी संपुर्ण अहवाल मागविला होता. त्याप्रमाणे जिल्हाधिकारी रायगड यांनी १/०६/२०२५ रोजी मा.अपर मुख्य सचीव (महसुल) यांना एस.ई.झेड.करीता संपादीत केलेल्या जमिन मिळकतीविषयी संपुर्ण अहवाल सादर केला.

महसुलमंत्री बावनकुळे साहेब यांनी सदरचे प्रकरण मंत्री मंडळाच्या बैठकी समोर ठेवुन त्यावर लवकरात लवकर निर्णय घेण्याचे आश्वासन सदरच्या सभेमध्ये दिले होते. त्याकरता सेझग्रस्त शेतकऱ्यांनी शनिवारी उरण तालुक्याचे आमदार महेश बालदी यांची भेट घेऊन सदरचे प्रकरण महसुलमंत्री बावकुळे साहेब यांचे तर्फे मंत्री मंडळाच्या बैठकी मध्ये मांडण्याकरता विनंती केली. ती त्यांनी मान्य करून लवकरात लवकर सेझग्रस्त शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवीण्यात येईल, असे आश्वासन दिले.

## कोर्लईत विवाहितेची आत्महत्या

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोर्लई गावात एका नवविवाहित तरुणीने घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना शुक्रवारी (दि.२९) उघडकीस आली आहे.

मयत तरुणीचे नाव भाग्यश्री समीर बलकवडे (वय ३२) असून, ती आपल्या नवविवाहित आयुष्यातील अवघ्या वर्षभरातले आनंदाचे क्षण साजरे करत होती. गणेशोत्सवासाठी कुटुंब मूळगाव कोर्लई येथे आले होते. दीड दिवसाचा गणपती उत्सव आनंदात साजरा झाला, परंतु दुसऱ्याच दिवशी अचानक वादातून ही घटना घडली.

मयत तरुणीची आई मंजुळा दत्ता पाटील (वय ५५, राबोडी–ठाणे) यांनी रेवदंडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार, भाग्यश्रीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी तिचा पती समीर विलास बलकवडे, सासरे विलास महादेव बलकवडे, सासू मीना विलास बलकवडे, आणि नणंद वैष्णवी विलास बलकवडे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२९ ऑगस्ट रोजी दुपारी ११ नंतर भाग्यश्री आपल्या ३.५ महिन्यांच्या बालकाला आंघोळ घालत होती. या वेळी पतीकडून चुकून बालकाच्या डोळ्यात पाणी गेले. यावरून झालेल्या तक्रारीतून वाद उभा राहिला. त्यावेळी सासूने समजूत घालून परिस्थिती नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला आणिं त्यावेळी तिथून सर्वजण भाग्यश्री सोडून सर्वजण बाहेर गेले होते, परंतु काही वेळाने घरात दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केल्यानंतर, आतून दरवाजा बंद असल्याचे समोर आले. दरवाजा तोडून पाहिल्यावर भाग्यश्रीने गळफास घेतल्याचे उघड झाले.

या प्रकरणी अधिक तपास रेवदंडा पोलीस करीत आहेत.

## रोज बाजार भाजी मार्केटच्या गणेशोत्सवानिमित्त आज पूजा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोज बाजार भाजी मार्केट स्वयंसहाय्यता महिला मंडळाच्या वतीने यंदाही सार्वजनिक गणेशोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, रविवारी (दि.३१) सकाळी १० ते १ या वेळेत श्री सत्यनारायणाची महापूजा होणार असून दुपारी १२ ते ३ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या उत्सवाचे आयोजन स्वयंसहाय्यता महिला मंडळाच्या अध्यक्षा तथा माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे. या धार्मिक आणि सामाजिक उपक्रमाला मोठ्या प्रमाणात भाविकांनी रोज बाजार भाजी मार्केट येथे उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक मंडळाने केले आहे.

## एटीएममधून पैसे काढून फसवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एटीएम कार्डाची अदलाबदली करून त्याद्वारे ५३ हजार रुपये काढून फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

उषा राजभर या खिडूकपाडा येथे राहत असून त्या त्यांच्या आईचे एटीएम कार्ड घेऊन डी मार्टच्या बाजूला कळंबोली येथे पैसे काढण्यासाठी गेले. पैसे काढत असताना एक इसम आत मध्ये आला आणि मला पैसे काढायचे आहेत तुम्ही लवकर पैसे काढा असे बोलला. या वेळी त्याने राजभर यांचा एटीएम पिन पाहिला. पैसे काढत असताना त्या इसमाने कार्ड काढून त्यांच्याकडे दिले.

या वेळी त्या व्यक्तीने त्याच्याकडिल एटीएम कार्ड मशीन मध्ये टाकून काहीतरी चेक करून तो निघून गेला. त्यानंतर त्यांच्या वडिलांच्या मोबाईल मध्ये ५३ हजार रुपये वेगवेगळे एटीएम मधून पैसे काढण्याचे मेसेज आले. यावेळी त्या इसमाने हातचलाखीने एटीएम चेंज करून दुसरे एटीएम कार्ड दिल्याचे त्यांच्या लक्षात आले.

## ध्रुवी कुंबेफळकरची बॅडमिंटन चॅम्पियनशिपमध्ये चमकदार कामगिरी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

योनेक्स सनराइज महाराष्ट्र मिनी स्टेट बॅडमिंटन चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेत स्पंक शटलर्स बॅडमिंटन अकादमीची खेळाडू ध्रुवी कुलदीप कुंबेफळकर हिने उत्कृष्ट कामगिरी करत तीन पदके पटकावली आहेत.

मुली एकेरी गट U-१३ मध्ये ध्रुवीने उपविजेतेपद मिळवले, तर मुली दुहेरी गट U-१३ मध्ये कायरा रैना हिच्यासह विजेतेपद पटकावले. यासोबतच मिक्स डबल्स U-१३ गटात खुश दीक्षित सोबत खेळताना विजेतेपदावर नाव कोरले.

या उल्लेखनीय कामगिरीमुळे ध्रुवीने आपली बहुआयामी खेळाडू म्हणून छाप पाडली आहे. तिच्या यशामागे मानसी गाडगीळ (प्रशिक्षक) यांचे मार्गदर्शन मिळत आहे. तिच्या यशाबद्दल ध्रुवीवर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.



## पनवेलमधील सार्वजनिक गणरायांचे बालकलाकार अर्जुनीने घेतले दर्शन

**पनवेल : वार्ताहर**

अल्पावधीतच राज्यभरात लोकप्रिय ठरलेली नाट्य आणि सिने बालकलाकार अर्जुनी हिने पनवेलमधील विविध गणेशोत्सव मंडळांना भेट देऊन गणरायाचे दर्शन घेतले.

सर्वप्रथम माजी नगरसेवक तथा भाजप जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांच्या घरच्या गणपतीचे दर्शन घेऊन बाप्पाचे आशीर्वाद घेतले. त्यानंतर अभिनव युवक मित्र मंडळ आयोजित 'पायोनियरचा राजा'चे दर्शन घेतले. या ठिकाणी केलेल्या सुबक व आकर्षक सजावटीचे अर्जुनीने मनापासून कौतुक केले. या वेळी मंडळाचे ज्येष्ठ सदस्य पत्रकार संजय कदम, कास्टिंग डायरेक्टर व भाजप सोशल मीडिया संयोजक प्रसाद हनुमंते, माजी नगरसेवक समीर ठाकूर, नवीन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे तसेच भूषण पोवळे उपस्थित होते.

या वेळी जे. जी. पाटील आणि पाटील कुटुंबीयांनी अर्जुनीला पुढील कारकिर्दीसाठी आशिर्वाद दिले. यानंतर अर्जुनीने मानघर येथील श्री स्वामी समर्थ मठात जाऊन दर्शनाचा लाभ घेतला. या ठिकाणी मठाधिपती किशोर पाटील सर विशेषतः उपस्थित होते. त्याचप्रमाणे माजी नगरसेवक डी. आर. भोईर यांच्यासुद्धा गणपतीचे तिने दर्शन घेतले.



## 'सेना महाराजांनी विठ्ठलभक्ती भारतभर प्रसारित केली'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रांतांच्या सीमा ओलांडून विठ्ठल भक्तीचा महिमा भारतभर प्रसारित करण्याचे महान कार्य थोर संत श्री. सेना महाराज यांनी केले, असे भावपूर्ण उद्गार ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व विविध सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी काशिनाथ जाधव यांनी काढले. पनवेल तालुका नाभिक समाज मंडळ यांनी सेना महाराज पुण्यतिथी निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये ते प्रमुख वक्ते या नात्याने बोलत होते.



ते पुढे म्हणाले, आपली भारतभूमी थोर संत–महंतांच्या वास्तव्याने पुनीत झाली आहे. आपली महाराष्ट्र भूमी तर संतांची मांदियाळी आहे. जाधव सरांनी कबीर, मीराबाई, तुलसीदास, सूरदास इत्यादी संतांचा उल्लेख केला. सेना महाराजांच्या बालपणाचा व त्यांच्या कार्याचा आढावा घेतला. त्यांच्या गुरु विषयी माहिती दिली. सेना महाराजांच्या अभंग संपदेविषयी त्यांनी विवेचन केले. महाराजांच्या १५० अभंग रचनेविषयी त्यांनी सांगितले. आम्ही वारीक वारीक करू हजामत बारीक. या अभंगाचे स्पष्टीकरण केले. हाताने काम, मुखाने नाम, आणि चित्ती समाधान. हे त्यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान जाधव सरांनी विशद केले.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या दीप प्रज्ज्वलनाने झाली. संत श्री. सेना महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून सामुदायिक आरतीचा सोहळा पार पडला. त्यात कृष्णादास रसाळ विरचित सेना महाराजांची देखील आरती झाली. आरत्यांमुळे मंगलमय वातावरण निर्माण झाले. अनेक सेवाभावी संस्थांच्या कार्यकारणीपदी कार्यरत असलेले ज्येष्ठ समाजसेवक राजकुमार ताकमोगे यांनी कार्यक्रमांच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. प्रमुख पाहुणे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व अनेक पुरस्कार प्राप्त मान्यवर दत्तात्रेय जाधव होते. विशेष उपस्थिती प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या माधुरी गोसावी यांची होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव बाळासाहेब चातुर्य यांनी केले. सूत्रसंचालन संस्थेचे सहसचिव राजेश नगरकर यांनी नेहमीच्या सफाईने केले.

ज्येष्ठ नागरिक संघाचे आलिशान सभागृह प्रेक्षकांनी तुडुंब भरले होते. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष राजन भालेकर,खजिनदार विनोद (नंदू)खरे,जिल्हा संघटक अमित पंडित, कार्यकारणी सदस्य तुषार रसाळ, नरसी देवडा, कांतीलाल देवडा, जयवंत शेलार,अशोक साळुंके आदींसोबत संस्थेचे कार्यकर्ते छगन परमार,राजन शेलार व अनेक नागरिक बंधू–भगिनी देखील उपस्थित होत्या. संस्थेचे उपाध्यक्ष बाळासाहेब चातुर्य यांच्या आभार प्रदर्शनाने या मधुर कार्यक्रमाची सांगता झाली.

पान १ वरुन

## भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू यांना जीवे मारण्याची जाहीरपणे धमकी

माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन म्हात्रे, माजी पंचायत समिती सदस्य जगदीश पवार, कृषी उत्पन्न बाजार समिती संतोष पाटील, माजी नगरसेवक सुनील बहिरा, करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे, माजी नगरसेवक नीता माळी आदी उपस्थित होते.

शेकापच्या कार्यक्रमात राजेंद्र पाटील यांनी बेताल वक्तव्य करत खालच्या भाषेत टीका केली होती आणि त्यामध्ये गणेश कडू यांना टार्गेट करत अक्षरशः मारण्याची धमकी उघडपणे दिली. या संदर्भात गणेश कडू यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्याकडे कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

गणेश कडू यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले की, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे व माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली मी दोन महिन्यांपूर्वी शेतकरी कामगार पक्ष सोडून भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केलेला आहे. त्यामुळे शेतकरी कामगार पक्षातील काही लोक माझ्यावर राग ठेवून आहेत. २४ ऑगस्ट रोजी पनवेलमध्ये एका कार्यक्रमात राजेंद्र महादेव पाटील (रा. वहाळ) याने सार्वजनिक भाषण करताना माझा नामोल्लेख करत थेट मारण्याची धमकी दिली... 'गणेश कडू दात दाखवत होता. या निमित्ताने मी गणेश कडूला सांगू इच्छितो तुझे दात घशात घालण्याइतकी ताकद माझ्या मनगटात आहे. तुला शेवटचा आणि पहिला अंतिम शब्द, परत जर तू दात दाखवलेस तर तुला तिथे येऊन फटकवेन, तुला सोडणार नाही,' अशा गुंडगिरीच्या शब्दात राजेंद्र पाटील याने मला मारण्याची धमकी दिलेली आहे.

राजेंद्र पाटील हा गुंड प्रवृत्तीचा व्यक्ती आहे. त्याच्याकडून माझ्या जीवितास धोका आहे. तो मला ठार मारण्याचा प्रयत्न करू शकतो आणि ही बाब राजेंद्र पाटील याने केलेल्या भाषणावरून स्पष्ट होत आहे. त्यामुळे पोलिसांना नम्र विनंती आहे की, राजेंद्र महादेव पाटील (रा. वहाळ) याच्यावर मला जीवे मारण्याची धमकी दिल्याबाबत कायदेशीर कारवाई करण्यात यावी, असे गणेश कडू यांनी निवेदनात अधोरेखित केले आहे.

दरम्यान, राजेंद्र पाटील हे सतत धमकी देण्याच्या विधानाने आणि गुन्ह्याने चर्चेत असतात. अशातच गणेश कडू यांना दिलेली जाहीर धमकी गुंड प्रवृत्तीची असल्याने त्यावर कारवाई करण्याची जोरदार मागणी होत आहे. त्यामुळे पोलीस प्रशासन आता पुढे कोणती कार्यवाही करते याकडे सर्वसामान्य माणसाचेही लक्ष लागले आहे.

***गणेश कडू यांनी माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे व प्रीतम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली भाजपात प्रवेश केला. पनवेल तालुक्यातील जनता गणेश कडू हे प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने व कष्टाने काम करणारे व्यक्तिमत्व म्हणून ओळखते. शेकापच्या कार्यक्रमात त्यांच्या पुढाऱ्यांच्या उपस्थितीत गणेश कडू यांना जीवनातून संपवण्याचे विधान राजेंद्र पाटील यांनी केले, तो प्रकार निषेधार्थ आहे. असा प्रकारची विधाने करणे हा राजेंद्र पाटील यांचा स्वभाव आहे. राजेंद्र पाटील यांच्यावर यापूर्वीही अनेक गुन्हे आहेत. धमकावण्याची भाषा त्यांच्याकडून होते. ती भाषा कुठल्याही कार्यकर्त्याला संताप आणणारी आहे आणि त्याचा पोलिसांनी बंदोबस्त करावा अशी आमची पोलिसांना विनंती आहे. पोलीस यामध्ये यशस्वी झाले नाहीत, तर नाईलाजाने आम्हाला तोच कायदा हातामध्ये घ्यावा लागेल याकडे पोलिसांनी लक्ष द्यावे आणि ही वळवळणारी तोंडे आहेत ती योग्य पद्धतीने बंद करावीत. शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्यांनासुद्धा या पद्धतीची भाषा त्यांच्या व्यासपीठावर बोललेली आवडत असेल, तर उद्या हे अस्त्र त्यांच्यावरदेखील असेच उलटू शकते याची जाणीव त्यांनी ठेवावी. त्यामुळे राजेंद्र पाटील यांना आवर घाला. स्टंटबाजी करणे हा त्यांचा स्वभाव आहे. अनेक जण त्याच्यावर नाराजी व्यक्त करतात, फक्त ते दबल्या तोंडाने बोलतात. आता आमच्या विरोधात बोललात, तर आम्हाला तसेच उत्तर द्यावे लागेल. राजेंद्र पाटील यांच्यावर कारवाई करताना त्यांच्यावर असलेले आधीचे गुन्हेही पोलिसांनी लक्षात घ्यावेत.***

**–प्रशांत ठाकूर, आमदार**

### कंपनी मोठी होण्यासाठी कर्मचाऱ्यांचा विश्वास महत्त्वाचा

या कार्यक्रमात दहावीच्या परीक्षेत कार्तिकी आर्गे, सानिका पाटील, स्वरा खेडकर, दुर्वा कडू, श्रेया घरत, पार्थ मोहिते, वैदेही म्हात्रे, अन्वी लाल, सेजल ठाकूर, युग मोकल, करुण्या गायकर, अनन्या चौहान तसेच बारावीच्या परीक्षेत श्रद्धा श्रीवास्तव, पार्थ सकपाळ, गार्गी काळे, जय तांडेल, शुभम कोळी आणि काजल कुमारी यांनी घवघवीत यश संपादन केल्याबद्दल त्यांचा लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर आणि टीआयपीएलचे डायरेक्टर अमोघ ठाकूर यांच्यासह उपस्थित अन्य मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## पोलादपूरच्या चोळई बुरूडवस्तीत विणलेल्या ओवसा सुपांना मागणी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील चोळई बुरूडवस्तीतील विणलेल्या सुपांमधून आज हजारो माहेरवाशिणी सुहासिनींचा 'ओवसा' पूजला जाणार आहे.

घरातील सुवासिनी गौरीची पूजा करतात आणि हळदी–कुंकू लावतात. गौरीसमोर दोन हातांनी भरलेले सूप ठेवले जाते. गौरीला नमस्कार करून सूप खाली ओढले जाते, या प्रक्रियेला 'वोवसणे' असे म्हणतात. यात सूपात पैसे आणि इतर वस्तू ठेवून गौरीच्या चरणी ठेवले जाते आणि गौरीला नमस्कार करून इच्छा सांगितल्या जातात. ओवाळलेल्या सुवासिनींना खणानारळाने ओटी भरली जाते आणि त्यांचा मान–सन्मान केला जातो. ही प्रथा कोकणातील एका लोकप्रिय परंपरेचा भाग आहे. या परंपरेसाठी आवश्यक वस्तू म्हणजे गौरीचे वाण असलेले सूप जे विणण्याची प्रथा कालबाहय होऊ लागली आहे. मात्र, पोलादपूरलगतच्या चोळई गावातील बुरूड समाजाच्या लोकवस्तीमध्ये आजही ही सूप जे विणण्याची परंपरा आहे.



बांबू लागवड करण्यासाठी कोकणात गेल्या काही वर्षांपासून उदासिनता असल्याने बुरूड समाजाच्या या व्यवसायाला कच्च्या मालाची कमतरता भासत होती. गौराईच्या वाणासाठी सूप, डालगे, टोपल्या, कणग्या तसेच अन्य बांबूपासून बनविण्यात आलेल्या बुरूड समाजाच्या परंपरागत हस्तकला कौशल्याच्या वस्तूंची जागा प्लास्टीक आणि फायबरच तकलादू आणि महागडया वस्तूंनी घेतली. मात्र, अशा परिस्थितीतही पोलादपूर तालुक्यातील सडवली ग्रुपग्रामपंचायत सडवली अंतर्गत चोळई गावातील बुरूडवस्तीमध्ये योगिता एकनाथ गायकवाड या महिलेने माहेरापासून जोपासलेली बुरूड कामाची परंपरा नेटाने सासरीदेखील सुरू ठेवली. बांबूपासून सूप विणताना योगिता गायकवाड यांनी आधीपासूनच बांबूच्या पट्टयांना रंग देऊन आकर्षकपणा आणण्याचे कसब दाखवून सुपांचा आकर्षकपणा अधिकच खुलविला आहे.

यामुळे या सुपांचे आकर्षण नवविवाहितेच्या माहेरी तसेच सासरीदेखील वाखणले जात असून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटातील पहिले गांव असलेल्या चोळईमध्ये हस्तकला केंद्र निर्माण झाल्यास या सुपांना अधिकच मागणी वाढेल, असा विश्वास योगिता गायकवाड यांना वाटत आहे.





पनवेल : गणेशोत्सवानिमित्त पनवेल शहर पोलीस ठाणे येथील गणरायाचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी दर्शन घेतले. या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, माजी नगरसेविका नीता माळी, उमेश इनामदार, पत्रकार संजय कदम आदी उपस्थित होते.





पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी विराजमान गणरायाचे भाजप ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, कामगार नेते सुरेश पाटील, गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, जनार्दन भगत शिक्षण प्रसार संस्थेचे सचिव डॉ.एस.टी. गडदे, कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत आदींनी दर्शन घेतले. या वेळी या सर्वांचे ठाकूर परिवाराकडून स्वागत करण्यात आले.


















पनवेल : येथील महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी परिसरातील विविध घरगुती गणपती बाप्पांचे दर्शन घेतले. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.

# सीकेटी महाविद्यालयात कोकेडामा तयार करण्याची अनोखी कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पनवेल येथे शनिवारी (दि.२३) कोकेडामा अर्थात मॉस बॉल प्लॅन्टर तयार करण्याची कार्यशाळा घेण्यात आली.



या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना जपानी बागकामकलेचा एक आगळावेगळा प्रकार प्रत्यक्ष करून दाखविण्यात आला. या कार्यशाळेचे आयोजन उद्यानविद्यातज्ञ आणि बागकाम अभ्यासक विवेक कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यशाळेचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाच्या विज्ञान विभाग प्रमुख डॉ. ज्योत्स्ना ठाकूर यांनी भूषविले, तर कार्यशाळेचे समन्वयक म्हणून वनस्पतिशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. आशा एस. नऱ्हे यांनी कार्यभार सांभाळला.

कोकेडामा ही जपानी बागकामाची एक अनोखी कला आहे. कोके म्हणजे शेवाळ आणि डामा म्हणजे गोळा. यात माती व खत यांचे मिश्रण करून गोळा तयार केला जातो, त्याभोवती शेवाळाचे आवरण घालून त्यात रोप लावले जाते आणि दोरीने बांधून तो एक आकर्षक मॉस बॉल प्लॅन्टर अर्थात शेवाळाचा गोळा तयार होतो. घरात सजावटीसाठी ठेवण्याजोगी ही जिवंत कलाकृती व्यक्तीला तणावमुक्त करून एक ध्यानात्मक अनुभव देते. पारंपरिक कुंडीऐवजी ही कलाकृती दोरीने बांधून लटकवली किंवा ट्रेवर ठेवली जाते. त्यामुळे ती घर, कार्यालय, हॉटेल आदी ठिकाणी आकर्षक दिसते.

या कार्यशाळेत प्रमुख वक्ते विवेक कदम यांनी प्रथम पॉवरपॉइंट सादरीकरणाद्वारे कोकेडामाचे महत्त्व, प्रक्रिया आणि त्यामागील सांस्कृतिक संदर्भ स्पष्ट केले. त्यानंतर प्रत्यक्ष प्रात्यक्षिक घेऊन विद्यार्थ्यांना टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण दिले. प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला स्वतःचे कोकेडामा तयार करण्याचा आनंददायी अनुभव लाभला.

या कार्यशाळेत एकूण ४१ विद्यार्थी व १२ प्राध्यापक वृंद सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी तयार केलेली कोकेडामा कलाकृती महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागात प्रदर्शित करण्यात आली असून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या कलात्मक प्रयत्नांचे मनापासून कौतुक केले. कार्यशाळेच्या शेवटी डॉ. आशा नऱ्हे यांनी आभार प्रदर्शन केले.

# ठाकरे गटाचे तुषार पाटील व कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**उरण : वार्ताहर**

भारतीय जनता पक्षाचे उरणचे कार्यसम्राट आमदार महेश बालदी यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवत, चिरनेर येथील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे कार्यकर्ते काशिनाथ दामोदर खारपाटील तसेच मोठीजुई ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तुषार नकुल पाटील यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात नुकताच जाहीर पक्षप्रवेश केला आहे.

आमदार महेश बालदी तसेच भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा उद्योगपती पी.पी. खारपाटील, उद्योगपती राजेंद्र खारपाटील भाजपचे महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य रवी भोईर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम पार पडला.

या वेळी भाजपचे उरण तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, भाजप उरण तालुका सहखजिनदार सुशांत पाटील, शशिकांत पाटील, रमेश फोफेरकर, प्रतीक गोंधळी, समीर डुंगीकर, देवेंद्र पाटील, जयेश खारपाटील, बाळकृष्ण पाटील, चंद्रकांत नारंगीकर, महेंद्र ठाकूर, तसेच अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# श्री गणराज मित्र मंडळ, कळंबोलीच्या राजाचा गौरवशाली ३० वर्षांचा प्रवास

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोलीचा राजा श्री गणराज मित्रमंडळ मंडळाने यंदा गणेशोत्सवाची ३० वर्षे यशस्वीपणे पूर्ण केली आहे, हा एक अत्यंत गौरवाचा क्षण आहे. मंडळाने सलग ३० वर्षांपासून सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून भक्तांच्या मनात स्थान निर्माण केले आहे.

कळंबोलीचा राजा श्री गणराज मित्रमंडळ यांनी १९९६ साली गणेशोत्सवाची सुरुवात सामाजिक ऐक्य आणि संस्कृती वृद्धिंगत करण्याच्या हेतूने केली. या मंडळाने दरवर्षी धार्मिक विधी, सामाजिक उपक्रम, आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून गणेशभक्तांना आकर्षित केले आहे. सलग ३० वर्षे साजरा करणाऱ्या गणेशोत्सवात मंडळाने सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य आणि पर्यावरण विषयक उपक्रम राबवले आहेत. मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांच्या सहभागाने मंडळाची उन्नती झाली असून स्थानिक आणि बाहेरील भक्तांचे प्रेम वाढले आहे.

बाप्पाचा आशीर्वाद समाजातील ऐक्य, नवीन उपक्रम आणि कार्यकर्त्यांच्या सहभागामुळे हे यश शक्य झाले आहे या ३० वर्षात मंडळाच्या कार्यकारिणीत आणि स्वयंसेवकांच्या योगदानामुळे



'कळंबोलीचा राजा श्री गणराज मित्रमंडळ' हे नाव कळंबोली शहराच्या गणेशोत्सवात अग्रस्थानी राहिले आहे. आज ३० वर्षांचा टप्पा गाठताना आमच्या मंडळाचा एकच संकल्प आहे. गणेशोत्सव हा भक्ती, बंधुता आणि समाजोपयोगी कार्यांचा संगम राहावा.

मंडळाने भाविकांसाठी वृत्तपत्र सोशल मीडियाच्या माध्यमातून गणपती बाप्पाचे दर्शन सुरू केले आहेत जे श्रद्धाळू भक्तांना आधुनिक तंत्रज्ञानाने गणेशदर्शनाचा आनंद देतात. सध्याच्या काळातील डिजिटल माध्यमांचा वापर करुन मंडळाने उत्सवाशी एकरूपता राखली आहे.

# ‘शोले’च्या स्पर्धेत ‘निशांत’ प्रदर्शित झाला...

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

पन्नास वर्षांपूर्वीचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व माध्यम जग वेगळेच होते. देशात २५ जून १९७५ रोजी आणीबाणी घोषित करण्यात आली होती आणि त्यात चित्रपट प्रमाणपत्र संस्थेचे नियम कडक झाले होते. विशेषत: हिंसक दृश्यांवर सेन्सॉरची धारधार कात्री लागत होती. ‘शोले’चा क्लायमॅक्स म्हणूनच बदलावा लागला. ठाकूर बलदेवसिंग (संजीवकुमार) गब्बरसिंगचा (अमजद खान) अतिशय त्वेषाने खातमा करतो असा क्लायमॅक्स बदलून पोलीस गब्बरसिंगला अटक करतात असे दाखवावे लागले.

सत्तरच्या दशकातच समांतर चित्रपट अथवा नवप्रवाहातील चित्रपट यांची चळवळ रुजत होती. त्यांनाही सेन्सॉर कैचीचे भान ठेवावे लागत होते. अशातच सुरुवातीस शांत असलेले ‘शोले’चे वादळ आता घोंघावू लागले होते. सगळीकडेच ‘शोले’चीच चर्चा होऊ लागली होती. मुंबईनंतर देशातील विविध राज्यांत आता टप्प्याटप्प्याने ‘शोले’ प्रदर्शित होत होत सामाजिक सांस्कृतिक वातावरणात उत्साह निर्माण होत होता. त्या काळात अशाच पद्धतीनुसार चित्रपट प्रदर्शित होत. सगळीकडेच थिएटर्सवर हाऊसफुल्लचा फलक मुक्काम करण्यासाठीच लागत होता (तो स्थिर होता) आणि अशातच श्याम बेनेगल दिग्दर्शित ‘निशांत’ (मुंबईत रिलीज ५ सप्टेंबर १९७५) दाखल झाला. म्हणजेच या चित्रपटाच्या प्रदर्शनास पन्नास वर्ष पूर्ण झाली आहेत आणि या गोष्टीचीही आपण दखल घ्यायलाच हवी.

‘शोले’च्या अक्राळविक्राळ लाटेसमोर ‘निशांत’चा निभाव लागणे कठीण. हे भिन्न पठडीतील चित्रपट. पहिला चित्रपट पारंपरिक लोकप्रिय मसालेदार मनोरंजक गोष्टीनी भरलेला, वनलाईनर डायलॉगबाजीत प्रभावी ठरलेला, तर दुसरा बौद्धिक समाधान देणारा. हा नवचित्रपट (समांतर/न्यू व्हेव/कलात्मक) पठडीतील बौद्धिक समाधान देणारा चित्रपट होता. दोन्हीचा प्रेक्षकवर्ग भिन्न. प्रसिद्धीचा पोतही वेगळा.

सत्तरच्या दशकात हिंदी चित्रपट कूस बदलत होता. अनेक गोष्टींची घुसळण होत होती. एकिकडे धमाकेदार मसालेदार मनोरंजक चित्रपट हाऊसफुल्ल गर्दीत थेटरात टाळ्या शिट्यांनी एन्जॉय केले जात होते. चित्रपट पाहणे म्हणजे जणू सेलिब्रेशन आहे असा माहौल होता. आवडलेला चित्रपट पुन्हा पुन्हा पाहण्याची नि ते इतरांना सांगण्यात हौस मौज होती. माऊथ पब्लिसिटी महत्त्वाची भूमिका बजावत होती.

दुसरीकडे पहायचे तर मृणाल सेन दिग्दर्शित ‘भुवन शोम’ (१९७०) पासून हिंदीत समांतर चित्रपट रूजू लागला. श्याम बेनेगल दिग्दर्शित ‘अंकूर’ने (१९७३)त्याला मुख्य प्रवाहात आणले. बासू चटर्जी दिग्दर्शित ‘रजनीगंधा’ने (१९७४) स्वच्छ मनोरंजक चित्रपट रुजवला. सतराम रोहरा निर्मित ‘जय संतोषी मा’ (मुंबईत रिलीज ३० मे १९७५) ने पौराणिक चित्रपटाची क्रेझ वाढवली. मनमोहन देसाई दिग्दर्शित ‘अमर अकबर ॲन्थनी’ने (१९७७) मल्टी स्टार कास्ट चित्रपटाची जणू गरज निर्माण केली. सत्तरच्या दशकात हिंदी चित्रपटसृष्टी भारीच तेजीत होती. त्याचीच फळे आज मिळताहेत.

यात समांतर चित्रपटाला आपलं अस्तित्व राखणे आवश्यक होते. आणि त्यातीलच एक चित्रपट निशांत. या वास्तववादी चित्रपटाचे सगळे चित्रीकरण हैदराबादजवळील एका गावात झाले. या चित्रपटाची पटकथा विजय तेंडुलकर यांची असून संवाद सत्यदेव दुबे यांचे आहेत. या चित्रपटाला वनराज भाटीया यांचे पार्श्वसंगीत आहे (हा



चित्रपट गीतविरहित आहे. समांतर चित्रपटात गाणी नसत. प्रसंगानुरूप एकादे नृत्य असे. अपवाद श्याम बेनेगल दिग्दर्शित भूमिका या चित्रपटाचा. त्यात गीत संगीत व नृत्य आहे. मराठीतील अष्टपैलू अभिनेत्री हंसा वाडकर यांच्या आत्मचरित्रावर आधारित हा चित्रपट आहे. स्मिता पाटील यांनीही ही अतिशय प्रभावीपणे ही भूमिका साकारली. आजही एखाद्या चित्रपट महोत्सवात निशांत, भूमिका, अंकूर या चित्रपटांचा समावेश होतो हे विशेष. )



‘निशांत’चे कथासूत्र असे... खेड्यातील तीन जमीनदार अण्णा (अमरीश पुरी), अंजैय्या (अनंत नाग), प्रसाद (डॉ. मोहन आगाशे) यांचा काहीसा भाबडा धाकटा भाऊ विश्वम (नसिरुद्दीन शाह) विवाहित असूनही गावातील शिक्षकाच्या (गिरीश कर्नाड) बायको सुशीलावर (शबाना आझमी) कमालीचा फिदा होतो. त्याचे लाड करत करत ते जमीनदार भाऊ त्या सुशीलाचे अपहरण करतात. विश्वम आपल्या पत्नी रुक्मिणीकडे (स्मिता पाटील) फारसे लक्ष देत नसतो. जमीनदार वृत्तीची दहशत, हिंसा आणि ग्रामीण भागातील गरीब स्त्रीचे शोषण या भोवती हे कथानक आहे. पोलीस पाटील (कुलभूषण खरबंदा) हे प्रकरण हाताळतो ते संशयास्पद ठरते. चित्रपट पाहताना आपण अगदी सुन्न होतो आणि तीच या चित्रपटाची ताकद आहे. देशातील ग्रामीण भागातील एक भयाण वास्तव या चित्रपटात मांडले आहे. पन्नास वर्षांपूर्वीचे ही भयानक स्थिती दुर्दैवाने आजही कायम आहे. असे चित्रपट व त्यावरची चर्चा कायमच त्याकडेच लक्ष वेधून घेतात. संकलक भानूदास दिवकर यांचाही खास उल्लेख हवाच. दक्षिण मुंबईतील डॉ. भडकमकर मार्गावरील टोपीवाला लेनमध्ये ते राहत. काही वर्षांनी त्यांच्या भेटीचा योग आला होता.

नसिरुद्दीन शाह आणि स्मिता पाटील यांची भूमिका असलेला हा पहिला चित्रपट. म्हणजेच त्यांच्याही कारकिर्दीला पन्नास वर्ष पूर्ण झालीदेखील. दोघांनीही समांतर चित्रपटात काम करत मग व्यावसायिक चित्रपटात पाऊल टाकले. समांतर चित्रपटात काम करुन मानाचे पुरस्कार प्राप्त होतील, पण आर्थिक गणितासाठी व्यावसायिक चित्रपटातून भूमिका साकारायला हवी हे वास्तव त्यांनी ओळखले (हे चित्र चांगले नाही, पण या गोष्टीला उत्तर नाही). सामाजिक सांस्कृतिक स्थितीवर ते रोखठोक भाष्य करतात हे विशेष उल्लेखनीय. नसिरुद्दीन शाहने आपले आत्मचरित्र And Then one Day मध्ये आपल्या या पहिल्या चित्रपटासाठीची निवड यापासून बरेच काही लिहिले आहे.

गिरीश कर्नाड यांनी झू स्टोरीमधील काम पाहून श्याम बेनेगल यांना नसिरुद्दीन शाहचे नाव सुचवले. श्याम बेनेगल यांच्या पहिल्या भेटीसाठी नसिरुद्दीन शाह पुण्यावरून (तेव्हा तो पुण्यातील एफटीआयमध्ये होता) पहाटेच बसने निघाला आणि पेडर रोडवरील त्यांच्या घरी लवकरच पोहचला. आपल्याला चित्रपटात काम मिळतेय याचा त्यात त्याचा आनंद होता. (दिल्लीत एनएसडीमध्ये असताना अमेरिकन कल्चरल सेंटरच्या नाट्य महोत्सवातील झू स्टोरी मध्ये नसिरुद्दीन शाहने भूमिका केली होती.) पंचेचाळीस दिवसांच्या चित्रीकरणात ‘निशांत’ पूर्ण झाला. दिवसांची काटकसर म्हणजेच बजेटचीही काटकसर असे गणित त्यात असे. त्याच वेळेस सलग चित्रीकरण करताना आपल्या चित्रपटावर सतत होत असलेल्या गप्पा, वाद विवाद हेदेखील चित्रपटाच्या पथ्यावर पडत असते.

‘निशांत’ आपल्या कारकीर्दीतील एक सर्वोत्तम कलाकृती असे नसिरुद्दीन शाह मानतो यातच या चित्रपटाचे मोठेपण अधोरेखित होतेय. विशेष म्हणजे, या चित्रपटाच्या शूटिंगच्या निमित्ताने नसिरुद्दीन शाहने आयुष्यात प्रथमच विमानतळ पाहिले आणि मुंबई ते हैदराबाद (आणि रिटर्न) असा पहिल्यांदाच विमान प्रवास केला तेही विशेष रोमांचित होत. ही गोष्ट आज अगदीच साधी वाटते, पण अशा अनेक छोट्या छोट्या गोष्टीतील आनंद खूपच मोठा असतो आणि तो आयुष्यभर मनात राहतो.

चित्रपटात गिरीश कर्नाड, अमरिश पुरी, अनंत नाग, स्मिता पाटील, मोहन आगाशे, कुलभूषण खरबंदा, साधु मेहर, सविता बजाज यांच्याही भूमिका. (या चित्रपटाच्या वेळेस गिरीश घाणेकर श्याम बेनेगल यांचे सहाय्यक दिग्दर्शक होते. काही वर्षातच ते प्रेम करूया खुल्लम खुल्ला इत्यादी चित्रपटांनी मराठीतील एक यशस्वी दिग्दर्शक म्हणून नावारूपास आले. हा तपशील मराठी चित्रपट रसिकांसाठी खूपच महत्त्वाचा)

चित्रपटाला कान्स आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (१९७६), लंडन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (१९७६), मेलबोर्न आणि शिकागो आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (१९७७) यात ‘निशांत’ला विशेष गौरविण्यात आले. त्या काळात जगभरातील अशा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात चित्रपट दाखल होणे विशेष उल्लेखनीय होते. समांतर चित्रपट चळवळीतील ती अतिशय महत्त्वाची गोष्ट ठरे. या चळवळीस ती सपोर्ट सिस्टीम ठरे.

ब्लेझ फिल्म एन्टरप्रायझेसच्या वतीने हा चित्रपट निर्माण करण्यात आले. या चित्रपटाच्या निर्मितीच्या काळात श्याम बेनेगल यांचे कार्यालय ग्रॅन्ड रोड येथील ज्योती स्टुडिओत होते. (जेथे भारतातील पहिला हिंदी बोलपट अर्देशीर इराणी दिग्दर्शित ‘आलम आरा’चे चित्रीकरण झाले. १९३१ सालचा हा चित्रपट आहे. आज या स्टुडिओत पूर्वीच्या काळातील फक्त मेकअप रुम्सच्या खाणाखुणा शिल्लक आहेत आणि इतर काही लहान मोठ्या उद्योगासह आजच्या काळातील बॅन्वेट आहे.)

हिंदीतील समांतर चित्रपट चळवळीतील निशांत हा एक उल्लेखनीय चित्रपट. ‘शोले’च्या वादळातही त्याने आपले अस्तित्व दाखवले. कसदार चित्रपट असा आपली जागा निर्माण करीत असतोच. आज जगभरातील अनेक देशांत ‘शोले’चे पन्नास वर्ष सेलिब्रेशन सुरू आहे, चित्रपट महोत्सवात ‘शोले’ दाखवला जातोय, सोशल मीडियावर मोठ्याच प्रमाणावर शोलेवर फोकस टाकला जातोय. त्यात ‘निशांत’चा विसर पडू नये. तोही तितकाच महत्त्वाचा चित्रपट आहे.

---

# चाळीतील गणपती

गेल्या काही वर्षांपासून ’फ्लॅट संस्कृती’ने आपल्या मनावर ताबा मिळविला आहे. बंद दारे, एकमेकांशी मोकळेप्रमाणे न बोलणे, एकमेकांच्या घरी न जाणे, आपल्याच कैफात राहणे इत्यादी गोष्टी आपल्याला ’फ्लॅट संस्कृती’मुळे नकळत आंदण मिळाल्या आहेत. परिणामी चार भिंतीत गाडून घेणे ही संकल्पना आकारास आली. दिवाळी, दसरा, गणपती इत्यादी सणांना काय करायचे हा प्रश्न त्यांना भेडसावत आहे, कोणी आपल्या घरी गणपती बाप्पा आणलेला आहे, हे शेजारच्यालाही कळत नाही. ते गुपचूप गणपती आणतात, दार लावून तसेच सीडी लावून गुपचूप आरती करतात व आपल्या महागड्या गाडीतून गणपती घेऊन जातात व विसर्जन करतात. या कानाचे त्या कानाला कळत नाही. असो!

चाळीतील परिस्थिती वेगळी असते. चाळीत कोणाच्याही घरी गणपती बाप्पा असेल, तर तो सर्व चाळीचा गणपती बाप्पा असतो. गणेश चतुर्थीच्या आधी आठ ते दहा दिवस गणपतीच्या स्वागताची तयारी मोठ्या हौसेने सुरू करतात. चाळीतील गणपती बाप्पा असल्यामुळे ज्या शेजाऱ्यांच्या घरात गणपतीचे आगमन होणार आहे त्या घरात चाळीतील कोणालाही कधीही घुसण्याची अलिखित परवानगी असते. चाळीतील सर्वजण आपल्याच घरातील समजून न सांगता मदत करीत असतात. गणपती बाप्पाच्या स्वागतासाठी शेजाऱ्याचे घर स्वच्छ करण्यासाठीदेखील चाळीतील मंडळी हिरीरीने पुढे येतात. त्यावेळेस ते कधीच विचार करीत नाहीत की मी त्यांच्या घरी जाऊन साफसफाई का करू. ज्या खोलीत गणपती बाप्पा विराजमान होणार असतील ती खोलीही चाळीतील एखादा रंगारी घरचेच काम असल्यासारखे रंगवून देतो. ते दिवस म्हणजे गणपती बाप्पा येणाऱ्या घरात मौजमजा करण्यास पूर्ण परवानगी असलेले दिवस.

चाळीतील गणपती उत्सवात प्रत्येकजण स्वत:हून कामाची जबाबदारी घेतो. पूजेच्या फुलांची जबाबदारी घेतलेली मंडळी आपल्या घरातील गणपती बाप्पा समजून पहाटे लवकर उठून फुलबाजारात जाऊन लागतील ती फुले आणून देतात. गणपतीची आरास करण्याची जबाबदारी घेतलेला लहान मुले व तरुणवर्ग गणेश चतुर्थीच्या आधी तीन-चार दिवसांपासून आरास करण्याच्या कामात गुंतलेला असतो. घरात रंगीत कागदाचे कपटे, डिंकाची बाटली, गोंदाची बाटली, कात्री इत्यादी सामान इतस्ततः पसरलेले असायचे. अगदी गणपती उत्सवात दर्शनाला येणाऱ्या नातेवाईकांना तसेच चाळीतील इतर भाविकांना देण्यात येणाऱ्या फराळाची तयारी चाळीतील महिलावर्ग अगदी आनंदाने करतात. त्याचा त्यांना कसलाही कमीपणा वाटत नाही.



चाळीतील सर्वजण एकोप्याने राहत असल्यामुळे लहान-मोठा हा भेदच त्यांच्यामध्ये नसतो. ही वेगवेगळी कामे करीत असताना थट्टा मस्करीला ऊत येऊन हास्याचे फवारे उडत असतात. ज्याची/जिची टेर खेचली जात असते तोही/तीही या हास्यात समरसतेने सहभागी होतात. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे नुकतेच लग्न झालेले जोडपे जर कामात मदत करत असेल तर चेष्टा मस्करीला अजूनच उधाण येते व ती नवपरिणीत वधू लाजून लाजून हैराण होते. ही सगळी कामे करताना भांडणे होतच नाहीत असे म्हणता येणार नाहीत. कधी कधी मनसोक्त भांडतात व तासाभराने पुन्हा एकत्र काम करण्यास सुरवात करतात. ही भांडणे अळवावरच्या पाण्यासारखी असतात. फार कमी वेळात मिटतात व लगेच दिलजमाई होते.

चाळीतील सर्वात छान गोष्ट म्हणजे भांडणे जास्त कोणी सहसा लांबवत नाहीत. जोपर्यंत ’पैशाचा मोठेपणा दाखवणे’ हा कली चाळीत शिरत नाही तोपर्यंत सगळेजण गुण्यागोविंदाने राहतात. ही सगळी धांदल. गडबड शब्दात वर्णन करता येणे कठीण आहे. त्याचा अनुभवच घ्यावा लागतो. तरच त्यातील खुमारी प्रत्ययास येते.

हे सगळे करता करता गणेश चतुर्थीचा दिवस येतो व गणपती आणण्याची एकच लगबग चाळीत सुरू होते. चाळीतील बालगोपाळांचा उत्साह तर पाहण्यासारखा असतो. गणपती आणण्याच्या आधी जवळ जवळ एक तास आधी नवीन किंवा ठेवणीतील कपडे घालून तसेच झांजा घेऊन गणपती बाप्पा आणण्यासाठी सज्ज होऊन मोठ्या माणसांची वाट बघत असतात. मग सगळे गणपती विसर्जनापर्यंत काय काय करायचे हे ठरवित असतात. काही महिलादेखील तयार होऊन त्या मुलांच्यात सहभागी झालेल्या असतात. एकूणच वातावरणात भरपूर उत्साह भरलेला असतो.

यथावकाश गणपती आणण्याचा पाट घेऊन घरातील कर्ता पुरूष येतो व सर्वजण गणपती जिथून आणायचा त्या चित्रशाळेकडे प्रस्थान ठेवतात. तिथून गणपती बाप्पा चाळीत झांजांच्या गजरात तसेच ’गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरया’च्या जयजयकारात प्रविष्ठ होतात. ज्या घरात गणपती बाप्पा स्थानापन्न होणार असतात त्या घरातील महिला बाप्पाचे उचित तसेच धर्मशास्त्राप्रमाणे स्वागत करतात व बाप्पांची आरास करून शोभिवंत केलेल्या स्थानावर विधिवत प्रतिष्ठापना केली जाते. सकाळ संध्याकाळ आरतीच्या वेळेस आरतीला या असे नुसते आवाहन केले की संपूर्ण चाळ आरतीला जमा होते.

बाप्पाच्या आरतीच्या वेळेस लहान मुले तसेच तरुणवर्ग या मंडळींनी घर ओसंडून वाहत असते. याचे मुख्य कारण म्हणजे आरतीच्या वेळेस या सर्वांना मोठ मोठ्यानी तसेच ओरडून आरत्या म्हणण्याची पूर्ण परवानगी मिळालेली असते. काही घरी तिथीप्रमाणे गौरींचे आगमन व्हायचे. चाळीतील समस्त महिलावर्ग गौरींचे आगमन ते विसर्जनदरम्यात गौरीउत्सवाचे सर्व व्यवस्थित व्हावे म्हणून झटत असतात. अशावेळेस गौरींना सजविणे हा या महिलावर्गाचा अत्यंत आवडीचा विषय.प्रत्येक महिला आपापल्या परीने गौरींना नटविण्याचे मार्ग सुचवित असतात.

गौरीपूजनाचा दिवस म्हणजे घरातील महिलावर्ग महानैवेद्यासाठी कंबर कसून कामाला लागलेला असतो. प्रत्येक घरी आपापल्या रीतीप्रमाणे महानैवेद्यासाठीची सिद्धता केलेली असते.

धर्मशास्त्राप्रमाणे आरतीचे तबक घेतलेला कद नेसतो, पण वर अंगरखा नसतो. आरतीदरम्यात मंत्रपुष्पांजली म्हटली जाते तेव्हा सर्व भाविकांना तांदळाच्या रंगीत अक्षता अथवा फुले वाटली जातात व मंत्रपुष्पांजली झाल्यावर बाप्पाच्या दिशेने वाहिले जाते. काही वेळेस काही वात्रट मंडळी घरून ’पांढरे/हिरवे वाटणे’ घेऊन येतात व मंत्रपुष्पांजली झाल्यावर आरतीचे तबक घेतलेल्याच्या अंगावर नेम धरून मारले जायचे. नेम धरून जोरात मारल्यामुळे पाठीवर त्याचा गोल वळ उठायचा, पण याबद्दल कोणालाही काही वाटत नसायचे. सर्वजण ही बाब चेष्टा मस्करीत घ्यायचे.

असे करता करता विसर्जनाचा दिवस उगवायचा व ’गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या’ च्या गजरात तसेच नाचत नाचत बाप्पाला समुद्रावर घेऊन जायचे. मोठी माणसे बरोबर असल्यामुळे नाचतांना सभ्यतेची पातळी कधीही ओलांडली जात नसे. मग तेथे ही आरडाओरडा करून

गणपतीची आरती केली जायची. याला कारण म्हणजे पुढील वर्षी गणपती येईपर्यंत ओरडण्याची संधी मिळणार नसे. आरती झाल्यानंतरचा प्रसाद म्हणजे पर्वणी असायची. हा प्रसाद म्हणजे नेहमीपेक्षा खास असायचा. गणपती उत्सवात आलेला प्रसाद या विसर्जनाच्या दिवशी सढळ हस्ते वाटला जायचा. गणपतीची मूर्ती विसर्जनासाठी पाण्यात घेऊन गेले की मग सर्वांची समुद्रावरच नाचगाणी सुरू व्हायची व्हायची.

असा हा चाळीतील गणपती उत्सवाचा अनुभव घेणे ही तर पर्वणीच आहे. ’फ्लॅट संस्कृती’त हा आनंद मिळत नाहीत. तेथे आरत्यासुद्धा मनसोक्त म्हटल्या जात नाहीत. काही काही ठिकाणी तर सीडी लावली जाते. असो! कालाय तस्मै नमः

**–मिलिंद कल्याणकर,**
नेरूळ, नवी मुंबई

---

# ख्यातनाम कादंबरीकार शिवाजी सावंत

लेखक, साहित्यिक व ख्यातमान कादंबरीकार अशी शिवाजी गोविंदराव सावंत यांची ओळख राहिलेली आहे. त्यांचा जन्म ३१ ऑगस्ट १९४० रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा येथे झाला. त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण आजऱ्यालाच झाले. प्रथम वर्ष बीएपर्यंत शिक्षण घेऊन पुढे वाणिज्य शाखेतून पदविका घेतली. त्यानंतर कोल्हापूरच्या मा राजाराम प्रशालेत त्यांनी अध्यापन केले. पुढे १९७४मध्ये ते पुण्यास स्थायिक झाले. तेथे महाराष्ट्र शासनाच्या शिक्षणखात्याच्या लोकशिक्षण या मासिकाचे संपादक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. १९८३मध्ये या मासिकाच्या संपादक पदावरून त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली.



राजाराम प्रशालेत अध्यापन करीत असतानाच शिवाजी सावंत यांनी मृत्युंजय (१९६७) ही आपली पहिली कादंबरी लिहिली. हिंदीतील केदारनाथ मिश्र यांचे कर्ण आणि रामधारी सिंह ‘दिनकर’ यांचे रश्मिरथी या दोन खंडकाव्यांचा त्यांनी मृत्युंजयच्या प्रस्तावनेत कृतज्ञतापूर्वक उल्लेख केलेला आहे. या कादंबरीत कर्णाच्या अंतरंगात शिरून त्याच्या मनोविश्वाचा शोध घेण्याचा प्रगल्भ प्रयत्न त्यांनी केला आहे. महाभारताच्या विराट विश्वातून कर्णाला त्याच्या दुःखी, यातनामय आयुष्याला त्याच्या अनेक संदर्भांसह वेगळे करून त्यांनी त्याची प्रतिमा साकारली आहे. कर्णामध्ये त्याच्या जन्माच्या आणि त्यानंतरच्या आयुष्यातील अपमानास्पद घटनांच्या प्रभावातून काही दोष निर्माण झालेले असले तरी तो एक सत्प्रवृत्त, समर्पणशील पण स्वाभिमानी पुरुष आहे. ज्या कुटुंबात तो आला, त्या कुटुंबातली सर्व नाती तो अत्यंत प्रेमाने आणि जबाबदारीने सांभाळतो. गुरुजनांबद्दल त्याच्या मनात कृतज्ञता आहे. मैत्रीसाठी तो आपले सर्वस्व अर्पण करतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वाची ही प्रकाशमय बाजू त्यांनी समर्थपणे मांडली.

शिवाजी सावंत यांच्या या पहिल्याच कादंबरीला वाचकांचा फार मोठा प्रतिसाद मिळाला. बहुतेक भारतीय भाषांतून ती अनुवादिली गेली. तिचा इंग्रजी अनुवादही झाला आणि मृत्युंजयकार ही उपाधीही त्यांना लाभली. छावा (१९७९) आणि युगंधर (२०००) या त्यांच्या त्यानंतरच्या कादंबऱ्या. छावा ही संभाजी महाराजांच्या जीवनावरची, तर युगंधर ही भगवान श्रीकृष्णाच्या जीवनावरची कादंबरी आहे. भव्योदात्त जीवनांबद्दल त्यांना वाटणारा आदर मृत्युंजय ते युगंधरपर्यंतच्या त्यांच्या तीनही कादंबऱ्यांमधून उत्कटपणे प्रकट होतो. छावामध्ये जनमानसात संभाजी महाराजांबद्दल निर्माण झालेली नकारात्मक स्वरूपाची प्रतिमा पुसून त्या जागी औरंगजेबाने दिलेल्या क्रूर मृत्युदंडाच्या शिक्षेला धीरोदात्तपणे सामोरे जाणारे, आपले राजेपद जबाबदारीने आणि विवेकाने सांभाळणारे संभाजी महाराज ते उभे करतात. त्यासाठी संभाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि त्यांच्या भोवतालच्या परिस्थितीचा ते मानसशास्त्रीय अंगाने विचार करतात. भारतीय ज्ञानपीठाने या कादंबरीचे हिंदी भाषांतर प्रसिद्ध केले आहे. श्रीकृष्णाच्या जीवनातले जे चमत्कार सांगितले जातात, ते वगळून श्रीकृष्ण दाखविणे हा युगंधर लिहिण्यामागचा त्यांचा हेतू होता. श्रीकृष्णासारखा एक माणूस भगवानपदापर्यंत पोहचतो त्याचप्रमाणे श्रीकृष्णासारखे आचरण आपण करू शकू असा विश्वास सर्वसामान्य माणसातही निर्माण होण्याची शक्यता आहे हे लक्षात घेऊन तो विश्वास जागृत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न आपण केला आहे, असे त्यांचे प्रतिपादन होते. मृत्युंजय आणि छावा या कादंबऱ्यांची नाट्यरूपेही त्यांनी निर्माण केली.

या साहित्यकृतींच्या व्यतिरिक्त सावंत यांनी जे लेखन केले, त्यांत लढत (दोन भाग–१९८६) आणि संघर्ष (१९९५) अशा दोन जीवनकहाण्यांचा अंतर्भाव होतो. लढत ही सहकारमहर्षी विठ्ठलराव विखे–पाटील यांची, तर संघर्ष ही प्रसिद्ध कामगार नेते मनोहर कोतवाल यांची जीवनकहाणी. अशी मने असे नमुने (१९७५) आणि मोरावळा (१९९८)मध्ये त्यांनी वेगवेगळ्या माणसांची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. शेलका साज (१९९४)मध्ये त्यांचे ललित लेख अंतर्भूत आहेत.

सावंत यांना अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळाले. गोवा येथे हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे १८ सप्टेंबर २००२ रोजी निधन झाले.

**–अ.र. कुलकर्णी (मराठी विश्वकोष)**

# श्रीवर्धन बसस्थानकात साचले पाणी

## घाणीचे साम्राज्य; प्रवाशांचा संताप





**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन बसस्थानकाचे आजचे चित्र पाहिले तर ते बसस्थानक नसून घाणीचे व पाण्याचे डबके वाटावे अशी स्थिती निर्माण झाली आहे. आवारात सर्वत्र पाणी साचले असून, परिसरात दुर्गंधी पसरली आहे. प्लास्टिकच्या बाटल्यांचा खच, चिखल, मोठमोठे खड्डे आणि साचलेले पाणी यामुळे प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

बसस्थानकाच्या बाजूला मोठ्या प्रमाणात पाणी साचलेले आहे. या पाण्यातून बसचालकांना आपली वाहने चालवावी लागत असून, प्रवाशांच्या अंगावर सतत चिखलटपके उडतात. यामुळे प्रवाशांचा संताप दिवसेंदिवस वाढत आहे.

साचलेल्या पाण्यामधून सरपटणारे विषारी प्राणी व साप फिरताना अनेकदा दिसून येतात. त्यामुळे एखाद्या प्रवाशाला चावून जीवितहानी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. तरीदेखील आगार प्रमुख व प्रशासन याकडे लक्ष देत नाहीत, ही बाब धक्कादायक आहे.

बसस्थानकाच्या प्रवेशद्वारावर व परिसरात अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडलेले आहेत. त्यामध्ये साचलेल्या पाण्यातून जाताना प्रवासी घसरून पडत आहेत व अनेक प्रवासी जखमी झाल्याच्या तक्रारी येत आहेत. प्रवाशांच्या सुरक्षेला थेट धोका निर्माण झाला आहे.

परिसरातील घाण, सडलेले कचरे, प्लास्टिकचा खच व साचलेले पाणी यामुळे प्रचंड दुर्गंधी पसरलेली आहे. बसस्थानकात थांबणेही प्रवाशांना अशक्य होत आहे. महिलांपासून ते लहान मुलांपर्यंत सर्वच प्रवासी हैराण झाले आहेत.

या सर्व समस्यांमुळे प्रवासी वर्गात तीव्र नाराजी असून, श्रीवर्धन आगार प्रशासन झोपेत आहे काय? मोठा अपघात वा जीवितहानी झाली तर जबाबदार कोण? असा सवाल संतप्त प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

प्रवाशांच्या सुरक्षेसाठी, आरोग्यासाठी आणि सोयीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन त्वरित उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा प्रवासी वर्गाचा रोष आणखी तीव्र होईल.

# खोपोली नगरपालिका हद्दीत दिवसातील दोन सत्रात पाणीपुरवठा

## थकीत पाणीपट्टी भरण्याचे आवाहन

*शहरात दोन वेळ पाणीपुरवठा करणेकामी नगर परिषदेस वाढीव पाण्याचे पंपिंग करावे लागणार असल्याने याकामी येणाऱ्या विजदेयकात देखील वाढ होणार आहे. शहरातील काही भागातील नागरिकांच्या नळजोडणीस तोट्या नसल्याचे निदर्शनास आले असून त्यामुळे देखील पाण्याचा अपव्यय होत आहे. पाणीपुरवठा व्यवस्थेच्या खर्चाच्या दालनेत पाणीपट्टी करापासून मिळणारे उत्पन्न अत्यल्प आहे. नागरिकांनी थकीत पाणीपट्टी कराचा भरणा करण्याचे आवाहन मा. मुख्याधिकारी यांनी नागरिकांस केले आहे.*

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिकेच्या हद्दीत दिवसातील दोन सत्रात पाणीपुरवठा होणार आहे. खोपोली शहरातील सर्व पक्षीय पदाधिकारी तसेच नागरिकांनी मुख्याधिकारी यांची भेट घेऊन मागणी केली. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

शहरात नगर परिषदेमार्फत सकाळ व सायंकाळ अशा दोन सत्रात पूर्वी पासून पाणीपुरवठा केला जात होता. नगरपरिषदेच्या काजूवाडी येथील जलशुद्धीकरण केंद्रावरील ४० लक्ष लिटर्स क्षमतेच्या साठवण टाकीस गेल्या अनेक वर्षांपासून असलेल्या गळतीतून पाण्याचा प्रचंड प्रमाणात अपव्यव होत होता. परिणामी, नगरपरिषदेस अतिरिक्त पाणी उपसा करावा लागत असल्याने महसुली पाण्याच्या प्रमाणात वाढ झाल्याने नगरपरिषदेवर फार मोठा आर्थिक भार पडत होता. तरी, गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या सदर बाबीवर प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी प्रामुख्याने लक्ष घालून नगरपरिषदेने साठवण टाकीस असलेली गळती काढण्याचे व दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर हाती घेतले. टाकीच्या दुरुस्ती कालावधीत शहरात एक वेळ परंतु, मुबलक पाणीपुरवठा करण्यात येत होता. २८ ऑगस्ट २०२५ रोजी साठवण टाकीस असलेली गळती काढण्याचे काम पूर्ण झाले असून त्यामधून होणारी गळती १०० टक्के बंद झाली आहे.

या कामाची पाहणी मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी केली. खोपोली शहरातील सर्व पक्षीय पदाधिकारी तसेच, नागरिक यांनी २९ ऑगस्ट २०२५रोजी मा. मुख्याधिकारी यांची भेट घेऊन साठवण टाकिस असलेली गळती काढण्याचे काम पूर्ण झाल्याने शहरात पूर्वी प्रमाणे दोन वेळ पाणीपुरवठा करण्याची मागणी केली.

नागरिकांच्या मागणीनुसार व्यापक जनहित विचारात घेता उद्यापासून शनिवार ३० ऑगस्ट २०२५ रोजी पासून नगरपरिषदेने शहरात होणारा पाणीपुरवठा पूर्वी प्रमाणे दोन वेळ करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष बाब म्हणजे यापूर्वी शहरात सर्वत्र दोन वेळ पाणीपुरवठा होत असताना देखील शेडवली, चिंचवली, श्रीराम नगर, डीपी रोड, हाल, सरस्वती नगर, म्हाडा कॉलनी, आय.टी. आय मागे हा भाग दोन वेळच्या पाण्यापासून वंचित होता. परंतु शहरात सर्वत्र समान जलवितरण या समानतेच्या तत्वावर शहरातील सर्वच भागात दोन वेळा पाणीपुरवठा करण्याचे आदेश मुख्याधिकारी यांनी पाणीपुरवठा विभागास दिल्याने शेडवली, चिंचवली, श्रीराम नगर, डीपी रोड, हाळ, सरस्वती नगर, म्हाडा कॉलनी, आय.टी. आय मागे या भागातदेखील सकाळ व सायंकाळ अशा दोन सत्रात पाणीपुरवठा होणार असल्याने त्याभागातील नागरिकांची फार वर्षापासूनची दोन वेळ पाण्याची मागणीदेखील पूर्ण झाली आहे.

# माणगावमधील विळे येथे सामाजिक सभागृहाचे लोकार्पण

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील विळे भाऊची आळी येथे ग्रामस्थांची अनेक वर्षांची मागणी पूर्ण होत भव्य सामाजिक सभागृहाचे लोकार्पण मोठ्या जल्लोषात पार पडले. या सोहळ्याचे उद्घाटन रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभुमी विकास मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले.



सभागृहाच्या लोकार्पणानंतर परिसरात आनंदाचे वातावरण पसरले. निजामपूर व विळे विभागातील शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमस्थळी घोषणाबाजी, जयघोष आणि टाळ्यांच्या कडकडाटात उद्घाटन सोहळा रंगला.

गावातील सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांना चालना मिळावी, युवकांना आणि महिला मंडळींना एक व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने हे सभागृह उभारण्यात आले आहे. ग्रामस्थांनी मंत्री महोदयांचा या उपक्रमाबद्दल मनः पूर्वक गौरव केला.

या वेळी उपस्थित मान्यवरांनी ग्रामविकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन दिले. सभागृहामुळे गावातील अनेक उपक्रमांना नवी उभारी मिळणार असून आगामी पिढ्यांसाठी हे एक सामाजिक केंद्रबिंदू ठरणार आहे, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला.


# कर्जतमध्ये चित्रकला स्पर्धा

**कर्जत : प्रतिनिधी**

गणेशोत्सवानिमित्त कर्जत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ विविध उपक्रमांचे आयोजन करीत असते. चित्रकला स्पर्धा दोन दिवस आयोजित केली होती. दोन गटात आयोजित केलेल्या या स्पर्धेत १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कर्जत सार्वजनिक गणेशोत्सवाचे हे ८९ वे वर्ष आहे. पहिल्या गटात पाचवी ते सातवी च्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सुमारे सत्तर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. 'श्रावण महिन्यातील कोणताही एक सण' हा विषय होता. दुसऱ्या गटात ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा होणार आहे. यामध्ये सुमारे ८० विद्यार्थ्यांचा सहभाग घेतला. 'गणेशोत्सववार कोणताही एक प्रसंग' हा त्यांचा विषय होता.

या वेळी अध्यक्ष आशिष गोखले, मंगेश जोशी, पंकज शहा, अमित मराठे, अभिजित मराठे, योगेश लोवन्सी, रघुनाथ खैरे आदी या स्पर्धेच्या आयोजनात महत्वाची भूमिका बजावली. या स्पर्धेचे परीक्षक प्रसिद्ध चित्रकार राजेंद्र दगडे असून १ सप्टेंबर रोजी निकाल जाहीर करण्यात येणार आहे.





**खालापूर : भाजप उत्तर रायगड जिल्हा चिटणीस नरेश पाटील यांना वाढदिवसानिमित्त जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहेरे, खालापूर तालुका अध्यक्ष सनी यादव, खोपोली शहर माजी अध्यक्ष रमेश रेटरेकर, इंदरमल खंडेलवाल, हेमंत नांदे, माजी नगरसेवक सूर्यकांत देशमुख, माजी उपाध्यक्ष दिलीप पवार, सुनील नांदे आदींनी शुभेच्छा दिल्या.**


# समुद्रकिनारा चिखलमय

## बाप्पाच्या विसर्जनाला होडीचा आधार

**रेवदंडा : प्रतिनिधी**

थेरोंडयातील मोरया मित्रमंडळाने सहकार्यातून दिड दिवसांचे श्री गणेशाचे विसर्जन होडीतून करून श्री गणेशभक्तांना दिलासा दिला. त्यांनी दिलेल्या सहकार्याचे आभार श्री गणेशभक्तांनी व्यक्त केले.

संपुर्ण रेवदंडा समुद्र किनारपट्टी या वेळी पावसाळयातील समुद्र उधाणाने चिखलमय झाल्याने नुकताच दिड दिवसांचे श्री गणेशाचे विसर्जनाचा प्रश्न निर्माण झाला होता. परंतू थेरोंडयाच्या मोरया मित्रमंडळाने परिश्रम घेत, चिखलमय परिस्थितीत श्री गणेशाचे विसर्जन होडीतून करून सहकार्य दिले. श्री गणेश भक्तानी थेरोंडा मोरया मंडळ मित्रमंडळाचे विशेष आभार व्यक्त केले. विशेष म्हणजे या सहकार्याचे बदल्यात श्री गणेशाचे विसर्जनासाठी राजी खुशीने ने दिलेले मानधन या युवकांनी थेरोंडा मोरया मित्रमंडळाच्या साखर चौथ श्री गणेश मंडळास दिले.



संपुर्ण समुद्र किनारपट्टी चिखलमय झाल्याने, दीड दिवसांचे श्री गणेशाचे विसर्जन सोहळा अडचणीत आला होता, यासाठी रेवदंडा मित्रमंडळाचे वतीने थेरोंडा येथील मोरया मित्रमंडळास दीड दिवसांचे श्री गणेशाचे विसर्जन करण्यासाठी सहकार्य मागितले, त्यानुसार मोरया मित्रमंडळाचे वतीने मनोज जंगली, निरंजन भगत, सुयश भगत, राज जंगली, मोक्ष जंगली, व सहकारी यांनी परिश्रम घेवून चिखलमय भागातून होडींने दीड दिवसांचे श्री गणेशाचे विसर्जनासाठी सहकार्य दिले.

# चौलमध्ये सामाजिक कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**रेवदंडा : प्रतिनिधी**

नुकतेच चौल मधील सामाजीक व युवा कार्येकर्ते विद्देश माळी, प्रतिक गुरव, विपूल नाईक, अंकित गुरव, अजिक्य वर्तक, यांनी शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश केला. दिवंगत शिवसेना उपजिल्हा प्रमुख विष्णू आचरेकर यांच्या पत्नीचा आमदार महेंद्र दळवी यांनी दिलेला मानसन्मानाने चौलवासिंय ग्रामस्थ, युवावर्ग व सामाजीक कार्यकर्ते भलतेच भारावून गेले असून चौलमध्ये आमदार महेंद्र दळवी व शिवसेना पक्षाला वाढता पांठिबा मिळत असल्याचे संकेत मिळते.

नुकतेच आमदार महेंद्र दळवी यांचे अलिबाग चाळमळा येथील निवासस्थानातील कार्यालयात पक्षप्रवेश सोहळा कार्यक्रम संपन्न झाला, यावेळी आमदार महेंद्र दळवी यांची प्रमुख उपस्थिती होती, तसेच शिवसेना उपजिल्हा प्रमुख शैलेश चव्हाण, व चौल शिवसेना जिल्हा परिषदेचे संभाव्य उमेदवार सचिन राउळ व नुकतेच पक्ष प्रवेश केलेले नागाव ग्रा.प. सदस्य परेश ठाकुर यांची उपस्थिती सुध्दा होती.

आमदार महेंद्र दळवी यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवीत चौल शितळादेवी येथील धडाडीचे सामाजीक कार्यकर्ते विद्देश माळी, प्रतिक गुरव, विपूल नाईक, अंकित गुरव, अजिक्य वर्तक, परेश ठाकूर यांनी शिवसेना पक्षाचा भगवा झेंडा खांद्यावर घेत शिवसेना पक्षात पक्षप्रवेश घेतला. त्यांचा पक्ष प्रवेश कार्यक्रम मोठया उत्साहात व जल्लोषात झाला. शिवसेनेत प्रक्ष प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे आमदार महेंद्र दळवी यांनी भगवी शाल परिधान करून स्वागत केले.

चौल शिवसेनेचे वतीने शिवसेना चौल शाखा प्रमुख सिध्देश शेणवईकर, जेष्ठ शिवसैनिक विकास पाटील, चौल पंचायत समिती गण प्रमुख प्रशांत शेवणईकर, भुषण घरत, निखिल राउत, आशिष कंटक, विशाल ठाकूर, मंदार वर्तक, इत्यादी शिवसैनिकांची उपस्थिती या वेळी होती.





**दर्शन पोळेकर यांच्या घरातील गणराय.**

### चौकशीची जाहीर नोटीस
### नियम ७ अ प्रमाणे

अर्ज क्रमांक:– ३८५/२५

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांकः शंकर देव व मारुती देव चॅरिटेबल ट्रस्ट, कळंबुसरे ......बाबत.

**श्री. उमेश चावजी भोईर**

....अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की,

सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेला नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:–

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत – (वर्णन) रोख रक्कम १०००/–रुपये

(ब) स्थावर मिळकत : (वर्णन) काही नाही.


सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून **तीस** दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहिनिशी व मी सहायक धर्मादाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे शिक्कयानिशी आज **दिनांक २८.०८.२०२५** रोजी दिली.

जा.क्र. १९४२/२५

**सही/–**
**अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**रायगड विभाग, रायगड**

# गणेशोत्सवामध्ये गुंजताहेत भजनांचे स्वर



**खोपोली : प्रतिनिधी**

गणपती म्हणजे विद्येची देवता घरी आल्यापासून घरामध्ये मांगल्याचे पवित्र वातावरण निर्माण झाल्यांचे पहावयांस मिळत आहे. दीड दिवसांचे गणपतीचे विसर्जन झाले.

आता पाच दिवसाचे आणि अनंत चर्तुदशीचे गणपती प्रत्येक गावामध्ये असल्यामुळे अनेक ठिकाणी सायंकाळी भजनांचे स्वर कानी पडत आहे. सर्वत्र ठिकाणी जणु बाप्पाचा गजर ऐकण्यास मिळत आहे. आपल्याकडून गणपतीची सेवा व्हावी या माध्यमातून जय मल्हार भजन मंडळाच्या माध्यमातून आंबिवली (तालुका खालापूर) गणपती उत्सवात भजनाचे स्वर गुंजतांना दिसत होते.

ज्या ठिकाणी गणपती ची स्थापना झाली आहे त्या ठिकाणी भजन हे होतच असते. विशेष म्हणजे तरुण मंडळी या भजनाकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित झाली आहे. त्याच प्रमाणे ज्येष्ठ मंडळीसुद्धा भजनामध्ये अग्रेसर आहे. नवीन चालीनुसार भजन ऐकण्यास आनंद मिळत असल्यामुळे भजन गाणारे यांचे महिनाभर अधिच बुकिंग झाले असून सकाळ, संध्याकाळ दुपार या तिन्ही प्रहरमध्ये भजन गायली जातात.

दहा दिवस आपल्या मुखातून गणेशांचे स्वर बाहेर पडावे, त्याच बरोबर गणेशाची सेवा घडावी हाच या मागील उद्देश असल्यांचे भजन करण्यांस आलेल्या जय मल्हार भजनी मंडळांनी बोलतांनी व्यक्त केले.



**भाजप माथेरान संपर्क प्रमुख प्रदीप घावरे**



**खोपोली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ**

### जाहीर सूचना

सर्व संबंधित व्यक्ती, अधिकृत रहिवाशी,पर्यावरण विषयक मंडळे,एन. जी. ओ. आणि इतर यांना या जाहीर सूचने द्वारे असे कळविण्यात येते कि,राज्य पर्यावरण प्रभावमूल्यांकन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी खालील वसाहत बांधकामेसाठी पर्यावरण अनुमती प्रदान केली आहे.

मेसर्स. फाल्कन आय इंफ्रा एल.एल.पी., याच्या, प्रस्तावित निवासी व व्यावसायिक इमारत, सर्व्हे क्र. 33/1/2/1/अ, साठी पत्र क्रमांक EC24C3803MH5184249N, File No. SIA/MH/INFRA2/485505/2024 दिनांक19/08/2025 पर्यावरणीय मंजुरी दिली आहे. सदरपत्राच्या प्रति महाराष्ट्र शासन पर्यावरण अनुमती विभाग, मंत्रालय व महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे उपलब्ध आहे, त्याच प्रमाणे https://parivesh.nic.in/ या वन व पर्यावरण मंत्रालयाच्या वेबसाइट पाहू शकता.

**सही/–**
**संचालक,**
**मेसर्स. फाल्कन आय इंफ्रा. एल.एल.पी.**
**पत्ता:–९०१, सॉलिटेयर, प्लॉट क्र. ३१/३२,**
**सेक्टर १८, खारघर, नवी मुंबई, महाराष्ट्र ४१०२१०. इंडिया.**

# संघाच्या स्थापनेचा वैचारिक आधार

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शंभर वर्षाचा प्रवास पूर्ण करत आहे. या शताब्दी वर्षात संधाने भारतातील विविध प्रांत, प्रदेश आणि समुदायांना एकत्र आणले आहे. संघ संघटनेचा विस्तार परदेशातही झाला आहे. भारतीयत्वासाठी समर्पित असलेले अनेक अनिवासी भारतीय आणि भारतीय वंशाचे नोक स्वतः ला सर्वांत पवित्र भगव्या ध्वजाखाली संघटित करतात आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जागतिक स्वरूप तयार करतात, संघाच्या शताब्दी वर्षानिमित, संघाच्या विस्ताराचे विविध पैलू, त्याची कार्ये आणि संघाच्या स्थापनेला कारणीभूत ठरणारे घटक याबद्दल प्रत्येकाने जागरूक असले पाहिजे. प्रत्येक देशभक्त भारतीयासाठी संघ ही केवळ एक संघटना नाही. हे एक असे कुटुंब आहे जिथे सर्वजण एकव राहतात, त्यांचे सुख-दुःख वाटून घेतात. सुसंवाद आणि एकतेच्या भावनेने ओडले जा.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ मानी विजयादशमीच्या पवित्र सणाला झाली. आद्य संघचालक, पुज्य डॉ. केशव बळीराम हेडगेवार भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात सक्रिय होते. त्यावेळची परिस्थिती पाहता, त्यांनी भविष्यातील प्रतिकूल परिस्थितीचा अंदाज वर्तवला होता. त्या वेळी हिंदूच्या अस्तित्वाला अनेक धोके होते आणि भविष्यातील परिस्थिती आणखी वाईट होण्याची चिन्हे होती. १८५७च्या कांतीनंतर बदललेल्या परिस्थितीत, दोन राष्ट्रांची कल्पना, खिलाफत चळवळीचा प्रभाव, हिंदूवरील वैचारिक हल्ले, धार्मिक द्वेषातून होणारे हत्याकांड आणि बाद इत्यादींमुळे भारत आणि भारतीयत्वासाठी समस्या निर्माण होऊ लागल्या होत्या. दुसरीकडे, भविष्यातील स्वातंत्र्य भारताच्या हिताच्या दिशेने नेण्याचे एक मोठे आव्हान दिसत होते. राष्ट्रीय एकात्मतेचे बंध तुटत होते. यांशिक आणि प्रादेशिक द्वेषही वाढू लागला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य संघचालक पुज्य मेशव बळीराम हेडगेवार जी यांनी या विषमता अनुभवल्या. त्यांच्या दूरदृष्टी असलेल्या व्यक्तिमत्त्वाला येणाऱ्या संकटांची जाणीव होती. संपूर्ण हिंदू समाजाचे संघटन करण्याच्या मुख्य उद्देशाने त्यांनी संघाची स्थापना केली. संघटनेशिवाय यश मिळवणे शक्य नाही. संघटना अशी असावी की ती कोणत्याही अंतर्गत किंवा बाह्य प्रभावामुळे विघटित होणार नाही. यासाठी, संघटनेशी एकतेचे तत्व जोडून, संघाचे सेवाकार्य विस्तारले.



संघाच्या स्थापना दिनाचे महत्त्व आणि महत्त्व देखील या संकल्पनेशी जोडलेले आहे. विजयादशमीचा सण हा श्रीरामांनी रावणावर मिळवलेल्या विजयाचा सण आहे. सार्वजनिक संघटनेच्या बळावर श्री रामांनी हा विजय शक्य केला. रामादलमध्ये वेगवेगळ्या समुदायांचा संगम होता. श्री रामाची सेना वानर, कोल, किरात, बनवासी इत्यादींच्या संघटनेतून तयार करण्यात आली होती. सर्वांच्या संघटित प्रयवातून श्री रामांनी लोकांचे रक्षण करण्याचे कार्य पूर्ण केले. एकता आणि सौहार्दाचे यापेक्षा मोठे उदाहरण कुठेही दिसणार नाही. पूज्य हेडगेवारजींनी संघाची स्थापना करण्यासाठी विजयादशमीचा सण निवडला जेणेकरून समाजातील सर्व घटक, संपूर्ण प्रदेशातील रहिवासी, डोंगराळ प्रदेशातील लोक, वनवासी, शहरवासी, गावकरी, वेगवेगळ्या भागात राहणारे सर्व भारतीय देशासाठी, त्यांच्या हिंदू संस्कृतीच्या रक्षणासाठी आणि भारतमातेच्या नेवेसाठी एकत्र येऊ शकतील.

आदरणीय डॉक्टर हेडगेवारजींची दूरदृष्टी होती की त्यांनी व्यक्तीशी नव्हे तर कल्पनेशी जोडण्यावर भर दिला. पूज्य प्रथम संघचालक जी यांना असे वाटले की राष्ट्रीय एकात्मतेची भावना बळकट करण्यासाठी, भारतातील नोकांना विघटन आणि विघटनापासून वाचवण्यासाठी आणि येणाऱ्या संकटांसाठी तयार करण्यासाठी, राष्ट्रीय एकता बळकट करावी लागेल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने सर्वांना एकत्र करण्याचे काम केले. त्यानुसार, मर्वात परम-पचित्र भगव्या ध्वजाच्या सावलीत एकत्र येणाऱ्या सर्व बंधू आणि बहिणीची एकमेव ओळख हिंदू, भारतीय आणि भारतवासी हीच राहते.

जात, धर्म, पंथ, मत, विचार, भाषा, पोशाख, प्रदेश, प्रांत, रंग इत्यादीचा भेद नाही. ही एकता आध्यात्मिक एकतेमुळे निर्माण होते. याच भावनेने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे बीज एका रोपात आणि नंतर एका मोठ्या वडाच्या झाडात, वटवृक्ष रुपांतरित केले आहे, ज्याच्या प्रत्येक फांदीपासून अनेक आहे तयार होतात. आद्य संघचालक आदरणीय डॉ. केशव बळीराम हेडगेवार, दुसरे सरसंघचालक आदरणीय माधव सदाशिव गोळवलकर (श्री गुरुजी) आणि त्यांचे उत्तराधिकारी श्री बाळासाहेब देवरस या तिघांच्या निःस्वार्थ सेवा व्रताचे फळ केवळ भारतातच नाही तर परदेशातही लाखो स्वयंसेवक, विविध कामे आणि प्रकल्प आणि असंख्य सेवाकार्याद्वारे दिसून येते. संघाच्या या गौरवशाली प्रवासामागे एकतेचे तत्व आहे, 'भी आणि तू एकाच रक्ताचे आहोत' अशी भावना असते.

भाषा, पोशाख, प्रादेशिकता, जात आणि पंथ... पूजा-पद्धती ही ओळख बाजूला ठेवून, प्रत्येक स्वयंसेवक आपली निष्ठा राष्ट्रीय धर्माशी जोडतो. संघाच्या विविध कार्यक्रमांमध्ये उपस्थित असलेल्या प्रत्येक व्यक्तीला राष्ट्र सेवक म्हणून ओळखले जाते. संघाच्या कार्यक्रमांचा मूळ पाया म्हणजे लोकांना एकमेकांशी अशा प्रकारे जोडणे की राष्ट्र-धर्माचा धागाच माध्यम बनेल. वैयक्तिक ओळख, तिचे स्वरूप काहीही असो.... संघाबाहेर सोडली जाते. वैयक्तिक सहभाग केवळ संघटनात्मक नसावा, तर तो जवळचा असावा यावरही भर दिला जातो. हेच कारण आहे की, संघाचे स्वयसेवकच संघ परिवाराचा भाग नाहीत, तर प्रत्येक स्वयंसेवकाचे कुटुंबही संघात मामीन होते आणि संघ परिवाराचा अविभाज्य भाग बनते. याच भावनेने, याच कल्पनेने, संघाचा शताब्दीचा प्रवास जगातील सर्वात मोठ्या कुटुंबाच्या रुपात आपल्यासमोर आहे आणि आपण या विशाल कुटुंबाच्या उत्तरोत्तर वाढीचे साक्षीदारही आहोत.

**-आचार्य अनामय (डॉ. राहुल मिश्र) पनवेल, नवी मुंबई**

# चवदारतळे विचार मंच महाड

आपल्या सर्वांना माहितच आहे की १९२७ साली २० मार्च या दिवशी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळे येथे सत्याग्रह केला. त्याची स्मृती म्हणून चवदार तळ्याच्या नावानेच महाडमध्ये चवदार तळे विचार मंच नावाचं एक कार्य चालतं. १९१८ साली या कामाचा मी आणि माझ्या काही साथीदारांनी प्रारंभ केला. याची प्रेरणा मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यातून घेतली. माझे वडील, श्री. धोंडीराम महाडीक हे देखील सामाजिक कार्यात बराच काळ कार्यरत होते. २५ वर्ष ते महाड नगरपालिकेचे सदस्य होते. त्यांना लोक मेंबर महाडिक या नावाने ओळखायचे. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून मी देखील सामाजिक काम करू लागलो.

आमचं घर महाडच्या रोहिदास वाड्यात. त्या ठिकाणी जेव्हापासून संघाची शाखा सुरू झाली तेव्हापासून, म्हणजे मी बाल असल्या पासून संघाच्या शाखेत नियमितपणे जातो. एकीकडे वडिलांकडून मिळालेला समाजसेवेचा वारसा आणि दुसरीकडे संघाची प्रेरणा यामुळे मी देखील सामाजिक कार्यात सहभागी झालो. समाजामध्ये सलोखा असावा, समरसता असावी ही संघाची शिकवण. यामुळेच मी या कामाकडे आकर्षित झालो. त्याच काळामध्ये सामाजिक समरसता मंचाचे श्री भिकू रामजी उर्फ दादा इदाते यांच्याशी माझा संपर्क आला. व मी या कार्यामध्ये अधिकच सक्रिय झालो. याच हेतूने मी व माझ्या काही साथीदारांनी चवदार तळे विचार मंच ची स्थापना केली. या माध्यमातून आम्ही दरवर्षी काही कामं करतो. त्यामध्ये २६ नोव्हेंबरला संविधान दिवस, ६ डिसेंबरला पूजनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महानिर्वाण दिवस आणि १४ एप्रिल ला बाबासाहेबांची जयंती हे आम्ही प्रामुख्यानं पालन करतो संविधान दिवसाच्या दिवशी आम्ही समस्त महाडकरांना निमंत्रित करून संविधान दिनाचा कार्यक्रम करतो. महाड तालुक्यातील सर्व सरपंचांना या कार्यक्रमाचे निमंत्रण पाठवतो व एक चांगला कार्यक्रम आम्ही करतो. २० मार्च हा चवदार तळे सत्याग्रहाचा दिवस. १९ व २० मार्चला प्रचंड प्रमाणात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी मोठ्या श्रद्धेने चवदार तळे येथे बाबासाहेबांना वंदन करायला येतात.

बाबासाहेबांच्या विचारांवर आधारित आम्ही पत्रकदेखील काढतो व ते समाजात वितरित करतो जेणेकरून बाबासाहेबांचे विचार समाजामध्ये प्रसारित व्हावेत. आलेल्या श्रद्धाळूंची व्यवस्था व्हावी म्हणून आम्ही भोजनाचे स्टॉल उभे करतो. १९ मार्चला साधारणपणे ४०० ते ५०० श्रद्धाळूंच्या भोजनाची व्यवस्था आम्ही करतो २० तारखेला ज्या दिवशी प्रत्यक्ष सत्याग्रह झाला होता त्या दिवशी आम्ही ४ ते ५ हजार लोकांच्या भोजनाची व्यवस्था करतो.




बाबासाहेबांच्या अनुयायांची थोडीफार सेवा या माध्यमातून आमच्या हातून घडते हे आम्ही आमचे भाग्य समजतो.

मागच्या वर्षी आम्ही चवदार तळे विचार मंचाच्या माध्यमातून बाबासाहेबांचे मूळ गाव आंबवडे या ठिकाणी भेट द्यायला गेलो. तेथे असलेल्या स्मारकाला अभिवादन केले. गावातल्या लोकांशी संवाद साधला. बाबासाहेबांच्या जे नातेवाईक त्यांना देखील भेटलो. याचा त्यांना खूप आनंद वाटला आणि आमच्या या कार्याला दिवसेंदिवस चांगली गती प्राप्त होवो अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. संपूर्ण समाजाला एकत्र घेऊन अख्खा समाज संघटित करून मार्गक्रमण करण्याचा संघाचा संस्कार आमच्या या कार्याच्या मुळाशी आहे. आमच्या या कामात समाजातील सर्व अठरापगड जातींचे लोक सहभागी आहेत.

**-सत्यवान धोंडीराम महाडीक**

## गणेश दर्शन



अनिकेत अशोक गायकवाड, कर्जत



पनवेल : धरणा कॅम्प गावातील बबन गोविंद पवार यांच्या घरात विराजमान गणपती बाप्पा.



कर्जत : साळोख येथील मनोहर मांडे आणि बंधू यांच्या निवासस्थानी विराजमान गणराय.



पनवेल : सांगटोली गावातील भाजप युवा नेते विठ्ठल फडके यांच्या घरातील गणपती बाप्पा.



प्रवीण राठोड, खांदा कॉलनी



**पनवेल : श्री स.स. बाळकृष्ण माऊली चरित्र ग्रंथाचा प्रकाशन सोहळा आणि गुरूपौर्णिमा उत्सव सोलापूर येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत नुकताच झाला. त्या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी श्री तीर्थक्षेत्र नंदेश्वरसाठी २१ लाख रुपयांची देणगी जाहीर केली होती. त्यानुसार शनिवारी त्यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी २१ लाख रुपयांचा धनादेश नंदेश्वर महाराज यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, अरुण घरत, अमोघ ठाकूर आदी उपस्थित होते.**

# गणेश विसर्जनावेळी भाजपकडून सेवा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुकापुर येथे गणपती घाटावरती दीड दिवसाच्या विसर्जनच्या वेळी भारतीय जनता पक्षाच्या वतीने सर्व भाविकांना गणपती विसर्जनासाठी आलेल्या सर्व भाविकांना शाल श्रीफळ व खाऊ वाटप करण्यात आला.

या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य व भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, सुकापुर पंचायत समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, पनवेल पूर्व भाजपाचे सरचिटणीस व ग्रामपंचायत सदस्य महेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत पोपेटा, माजी उपसरपंच आळूरामशेठ केणी, ज्येष्ठ नेते शशिकांत पाटील, सुकापुर पंचायत समिती सरचिटणीस उदय म्हस्कर, राहुल पोपेटा, रूपेश पाटील, आत्माराम पाटील, संजय पाटील, युवा कार्यकर्ते प्रशांत म्हात्रे आदी सुकापुरचे भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते. दीड दिवसाच्या गणरायाचे भक्तिभावाने विसर्जन करण्यात आले.

# भजन स्पर्धेला उरणमध्ये उत्तम प्रतिसाद

## मंत्री आदिती तटकरे यांच्याकडून कौतुक

**उरण : बातमीदार**

उरण तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या उरण विधानसभा मतदार संघ मर्यादित महिला भजन स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. रविवारी उरणच्या जेएनपीए वसाहतीतील बहू उद्देशिय सभागृहात घेण्यात आलेल्या या भजन स्पर्धेच्या निमित्ताने अनेकांची सुप्त कलाकारी देखील अनुभवायला मिळाली. त्यामध्ये अवध्या १० वर्षांच्या एका चिमुकल्या तबला वादकाने सर्वांचे लक्ष वेधले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मागील अनेक महिने जिल्हाभरात विविध कार्यक्रम सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून उरण तालुक्यात देखील या स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये तब्बल १३ विविध भजनी मंडळांनी सहभाग नोंदवला होता. सकाळी ९ वाजता सुरू झालेली ही स्पर्धा संध्याकाळी ७ वाजेपर्यंत चालली.



या स्पर्धेच्या ठिकाणी राज्याच्या महिला व बालकल्याण विभागाच्या कॅबिनेट मंत्री ना. आदितीताई तटकरे यांनी भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले. या वेळी प्रमुख पाहूणे म्हणून महिला जिल्हाध्यक्ष उमाताई मुंडे, जासई हायस्कूलच्या प्राध्यापिका सुलोचना सुरेश पाटील, अपूर्वा पतसंस्था अलिबागच्या अध्यक्षा ॲड. कविता प्रवीण ठाकूर उपस्थित होत्या.

या भजन स्पर्धा आयोजनात उरण तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सर्व कार्यकर्त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. त्यामध्ये तालुका अध्यक्ष परिक्षित ठाकूर, विधानसभा क्षेत्र अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य वैजनाथ ठाकूर, माजी जिल्हा परिषद सदस्या कुंदाताई वैजनाथ ठाकूर, माजी अध्यक्ष मनोज भगत, शहर अध्यक्ष तुषार ठाकूर,शहर उपाध्यक्ष सुमिता तुपगावकर,श्री गुरुकृपा संगीत परिवारचे अध्यक्ष सुप्रिया घरत, तुषार घरत यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.

या निमित्ताने मंत्री आदितीताईंनी एक घोषणा केली असून यावर्षी ज्या काही सर्वच तालुक्यात तालुका स्तरीय भजन स्पर्धा झाल्या आहेत. त्यांच्यातील विजेत्यांच्या साठी आपण पुढील वर्षी जिल्हास्तरीय स्पर्धा ठेवणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. त्यांच्या घोषणेचे स्पर्धकांनी उत्स्फुर्तपणे स्वागत केले.

या स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक आई भवानी प्रासादिक भजन मंडळ सांताकृझ पुर्व यांना मिळाला असून गायिका ऋतिका मुरूडकर या होत्या. द्वितिय क्रमांक आई एकविरा महिला भजन मंडळ दुंदरेपाडा यांना मिळाला असून गायिका सुजाता पाटणकर या होत्या. तृतिय क्रमांक ओम साई भजन मंडळ खरसुंडी खालापूर यांना मिळाला असून त्यांच्या गायिका हर्षदा सालेकर या होत्या तर उत्तेजनार्थ पारितोषिक श्री. कृष्ण प्रासादिक भजन मंडळ कुडूस अलिबाग यांना मिळाला असून त्यांच्या गायिका पुजा पाटील या होत्या.

स्पर्धेत उत्कृष्ट तबलावदक म्हणून ओमकार कराळे यांना घोषित करण्यात आले तर उत्कृष्ट गायिका म्हणून पुनम आगरकर यांना गौरविण्यात आले. या संपुर्ण स्पर्धेचे परिक्षण माऊली सावंत, ओम बोंगाडे आणि भाग्यश्रीताई देशपांडे यांनी केले. सुप्रिया घरत, तुषार घरत यांनी सुंदर व उत्तम असे कार्यक्रमाचे आयोजन,नियोजन केल्याने सर्व जनतेनी त्यांचे व आयोजकांचे आभार मानले आहेत.

# कालवा मार्ग कार्यान्वित झाल्यास कोंडी फुटणार

## मंत्री भरत गोगावलेंनी दिले बांधकाममंत्र्यांना पत्र

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव, इंदापूर परिसरातील नागरिक, व्यावसायिक, प्रवासी व पर्यटक यांच्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक कोंडी ही कायमची डोकेदुखी ठरली आहे. इंदापूर व माणगाव येथील बायपास रस्त्यांची कामे रखडल्यामुळे या भागातील नागरिकांना तसेच महामार्गावरील वाहनधारकांना वारंवार प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

या समस्येवर तोडगा काढण्यासाठी पर्यायी मार्गाचा शोध अनेक वर्षांपासून सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेना युवासेना दक्षिण रायगड जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांनी दोन दिवसांपूर्वी रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकास राज्यमंत्री भरत गोगावले यांना लेखी निवेदन सादर केले होते. या निवेदनात वाढवण-कालवण-दाखणे-नाणोरे-माणगाव या कालवा मार्गाचा उल्लेख करत, तो पर्यायी मार्ग म्हणून वापरल्यास माणगावातील वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमस्वरूपी सुटू शकतो, अशी भूमिका मांडण्यात आली होती.

या निवेदनाची तातडीने दखल घेत मंत्री भरत गोगावले यांनी सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांना २६ ऑगस्ट रोजी अधिकृत पत्र पाठवून या कालवा मार्गाचा प्रस्तावित रस्त्यांच्या कामांमध्ये समावेश करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

ना. गोगावले यांनी स्पष्ट केले की, या मार्गाचा काही



भाग डांबरीकरण झालेला आहे, तर उर्वरित भागाचे काम पूर्ण झाल्यास हा रस्ता सुरक्षित व सोयीस्कर पर्याय ठरेल. त्यामुळे नागरिकांना होणारा त्रास मोठ्या प्रमाणात कमी होईल तसेच पर्यटक व व्यावसायिकांना अखंडित व वेगवान वाहतूक सुविधा उपलब्ध होईल. स्थानिक पातळीवर या निर्णयाचे स्वागत होत असून अनेक वर्षांपासून रखडलेल्या वाहतूक कोंडीच्या प्रश्नावर आता ठोस मार्ग निघण्याची आशा नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. मंत्र्यांनी घेतलेल्या या तातडीच्या दखलीमुळे माणगाव-इंदापूर परिसरातील विकास प्रक्रियेला गती मिळणार असून शासनाचा वेगवान निर्णयप्रक्रियेवर विश्वास अधिक दृढ होणार आहे.

मुंबई-गोवा महामार्गावर दरवर्षी सण-उत्सव, सुट्टीचा हंगाम, लग्नसराई तसेच सतत वाढणाऱ्या पर्यटकांच्या गर्दीमुळे भीषण वाहतूक कोंडी निर्माण होते. गौरी गणपती, होळी, दीपावली किंवा उन्हाळा सुट्टी कोणताही काळ असो, या महामार्गावर नागरिकांना तासन्तास वाहनांच्या रांगांमध्ये अडकून बसावे लागते. या परिस्थितीत प्रवासी, व्यापारी, पर्यटक यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

इंदापूर व माणगाव येथील बायपासचे काम रखडले असल्याने हा प्रश्न सुटण्यास अजून काही कालावधी लागणार आहे, मात्र दररोजच्या त्रासाला कंटाळलेल्या नागरिक, पर्यटक, प्रवाशांनी याचा पर्याय सुचवला आहे. इंदापूर-वाढवण-पाणसई-कालवण-दाखणे-मुंढेवाडी-नाणोरे-माणगाव हा कालवा मार्ग तातडीने डांबरीकरण करून कार्यान्वित झाल्यास माणगावातील वाहतूक कोंडी कायमची संपुष्टात येऊ शकते.

या रस्त्याचा काही भाग आधीच तयार असून उर्वरित काम पूर्ण झाले, तर हा मार्ग मुंबई-गोवा महामार्गावरील कोंडीचा खरा दिलासादायक पर्याय ठरेल, असा नागरिकांना ठाम विश्वास वाटत आहे.

# माणगावमधील कळमजे पुलाचे काम मार्गी लावण्याची मागणी

### भाजप तालुका माजी अध्यक्ष संजयअप्पा ढवळेंनी दिले निवेदन



**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर माणगावजवळील कळमजे गावच्या फाट्याजवळ गोद नदीवरील पूल गेल्या अनेक वर्षांपासून उभा असून पावसाळा आला की या पुलाला पुराचे पाणी लागणे ही वारंवार घडणारी समस्या बनली आहे. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक विस्कळीत होत असून वाहनधारकांना व नागरिकांना निजामपूरमार्गे पर्यायी रस्ता वापरावा लागतो. परिणामी प्रवाशांचे मोठ्या प्रमाणावर हाल होतात.

या वेळी भाजप माणगाव तालुका माजी अध्यक्ष संजयअप्पा ढवळे, दक्षिण रायगड जिल्हा चिटणीस चिन्मय मोने, माणगाव तालुका गोविंद कासार, माजी उपतालुका अध्यक्ष अरुण पेणकर, सुरेंद्र साळी, कुर्ले अण्णा, शर्मिला सत्वे, रितेश निवाने, राजू मुंढे, योगेश पालकर, राहुल धूपकर, आनंन राजबर, अश्विनी कडू, जयेंद्र मुंढे, सदानंद अडीत, सोहम शिर्के, मृदल भोनकर, भारत जैन, गणेश राजपुरकर, दीपक भोसले, तुषार नवगणे, जयदीप करडे, रोहित कदम, विश्वास कदम, विशाल शिगवण, रेवती कोळी, राकेश ढवळे, देवेंद्र ढवळे, फौजी अशोक घाग यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजप माणगाव तालुका माजी अध्यक्ष संजयअप्पा ढवळे यांनी तहसीलदार दशरथ काळे यांना लेखी निवेदन देऊन सविस्तर चर्चा केली व या पुलाचे काम तातडीने न झाल्यास भाजप उग्र आंदोलन उभे करेल, असा इशारा दिला. त्यांनी या निवेदनात स्पष्ट केले की, संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करून त्याच्यावर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी. नागरिकांच्या सुरक्षेशी खेळ करणाऱ्या व शासनाच्या निधीचा अपव्यय करणाऱ्या ठेकेदाराविरुद्ध ठोस पावले उचलली नाहीत, तर नागरिकांचा संताप उफाळून येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# चणेरा-ऊसरमार्गे रोहा रस्ता डिसेंबरअखेर पूर्ण करण्याचे आश्वासन

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील चणेरा-ऊसरमार्गे रोहा हा महत्त्वाचा रस्ता गेली अनेक वर्षे रखडलेला असून शासनाने २०२१मध्ये मंजूर केलेल्या तब्बल पाच कोटी रुपयांच्या निधीनंतरही हा रस्ता अद्याप प्रवाशांना उपलब्ध झाला नव्हता. ऑक्टोबर २०२५मध्ये वर्कऑर्डर संपल्यानंतरदेखील रस्ता खुला झाला नाही. यामुळे ग्रामस्थांमध्ये संताप उसळला आहे.

या रस्त्यामुळे रोहा-चणेरा या १९ किमीच्या अंतरात तब्बल १० किमीची बचत होणार असून, रोहा रेल्वे स्टेशनपासून अलिबाग, मुरुड, फणसाड अभयारण्य, काशिद बीच, रेवदंडा आणि साळावचे गणेश मंदिर ही पर्यटनस्थळे जवळ येणार आहेत. त्याचबरोबर चणेरा पंचक्रोशीतील सुमारे ५० गावे रोह्याशी अधिक वेगाने जोडली जाणार आहेत. त्यामुळे या रस्त्याचे महत्त्व अधोरेखित होते.

प्रशासनाच्या दिरंगाईवर संताप व्यक्त करत प्रकाश विचारे यांच्या नेतृत्वाखाली चणेरा येथे जोरदार आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात पंचक्रोशीतील सुरेश मोरे, अनिल साळावकर, शंकर दिवकर, पराग घाग, समीर वारगुडे, अरुण खानविलकर, गोपाळ धारपवार, मजिद भुरे, गजानन साळवी, चंद्रकांत चौलकर, देवळे



आदींसह ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना विचारे म्हणाले, शासनाने दिलेला निधी वापरूनही आजवर काम रखडवण्यात आले आहे. ग्रामस्थांचा संयम संपत चालला आहे. जर डिसेंबर अखेरपर्यंत रस्ता पूर्ण झाला नाही, तर यापेक्षाही उग्र आंदोलन छेडले जाईल.

या वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता विजय बागुल व अरुण पाटील यांनी डिसेंबर अखेरपर्यंत रस्ता डांबरीकरण करून पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. यासोबतच त्यांनी व्हिडिओ व लेखी स्वरूपात जाहीर घोषणा केली. त्यानंतरच आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. दरम्यान, राज्य शासनाने न्हावे व रोहा येथे घोषित केलेल्या ग्रोथ सेंटरच्या विकासाला या रस्त्याचा मोठा हातभार लागणार असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले.

# गोवेले येथील गणपती मंदिर भाविकांचे आकर्षण

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील गोवेले हे गाव गर्द हिरव्यागार झाडीत वनराणीच्या सानिध्यात असून तेथील गणपती मंदिर पेशवेकालीन व मंदिराला ऐतिहासिक वारसा आहे. हा गणपती नवसाला पावतो अशी ग्रामस्थांची श्रद्धा आहे.

पुण्याच्या पुराततत्व खात्यामध्ये हे मंदिर पेशवेकालीन असावे अशी नोंद आहे, कारण श्रीमंत पेशव्यांचे श्रीवर्धन जन्मगाव असून ते गोवेलेमार्गे श्रीवर्धनला जात असत. त्यावेळी श्रीमंत पेशव्यांनी या मंदिराची स्थापना करुन कालांतराने तेथे मंदिर बांधण्यात आले. काही काळ येथील मंदिरातील दिवाबत्तीसाठी सरकारी निधी मिळत असे, असे काही



जाणकारांचे म्हणणे आहे. या गणेशाची मुर्ती सुबक व आकर्षक आहे. मूर्ती पाषाणाची असून डाव्या सोंडेचा हा गणेश हाकेला नेहमीच धावतो.

या गोवेले गावाला शिवरायांची भूमी म्हणून ओळखले जात असून पुरातन शिल्पे येथे पहावयास मिळतात तसेच या मंदिराच्या गाभाऱ्यातून रायगडाचे सहज दर्शन होते. म्हणूनच काही लोकांच्या मते हे मंदिर शिवकालीन आहे असे म्हणतात. २००९ साली गोवेले ग्रामस्थांनी या मंदिराचा जीर्णोध्दार केला. तेव्हापासून येथे माघी गणेश जयंती उत्साहाने साजरी करुन विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. प्रत्येक वर्षाच्या फेब्रुवारीमध्ये या गावातील तरुण तसेच वयोवृद्ध मुंबईकरांना व ग्रामस्थांना हरिनामाचे वेध लागतात. गावातील होतकरु व मुंबईतील मंडळी वेगवेगळी कमिटी स्थापन करुन या कार्यक्रमाची रुपरेषा ठरवितात.

हे मंदिर गावालगतच्या छोट्या टेकडीवर आहे. या गावाची नवलाई म्हणजे चार दिवस हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते.



**माणगाव : ग्रामपंचायतीचे माजी सदस्य रणधीर कनोजे यांच्या सिद्धीनगर येथील निवासस्थानी गणरायाचे दर्शन घेण्यासाठी आलेले राज्याचे रोजगार हमी योजनामंत्री भरत गोगावले यांचे कनोजे कुटुंबियांतर्फे स्वागत करताना रणधीर कनोजे व सारंग कनोजे.** (छाया : सलीम शेख)

# मुरूड एसटी आगारात सीएनजी पंप होण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणार -खासदार तटकरे

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड एसटी आगाराला सीएनजी पंप होण्यासाठी कार्यकर्त्यांनी मागणी केली आहे. प्रवासीवर्गाचा वेळ वाचवण्यासाठी त्यांनी केलेली मागणी रास्त असून याबाबत त्वरित कार्यवाही होण्यासाठी संबंधित अधिकारीवर्गाची विशेष बैठक ४ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीमधूनच मुरुड एसटी आगारला सीएनजी पंप होण्यसाठीचा मार्ग खुला होणार असल्याचे प्रतिपादन खासदार सुनील तटकरे यांनी केले.

या संदर्भात खासदार तटकरे यांच्या सुतारवाडी येथील निवासस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष मंगेश दांडेकर, सोशल मीडिया सेलचे जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन, आगरदांडा ग्रामपंचायतीचे



सरपंच आशिष हेदुलकर, माजी नगरसेवक प्रकाश सरपाटील, आगरदांडा ग्रामपंचायत सदस्य युसूफ अर्जबेगी आदींच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले. त्या वेळी उपस्थित शिष्टमंडळासमोर आपले विचार व्यक्त करताना खासदार तटकरे बोलत होते.

या वेळी खासदार सुनील तटकरे म्हणाले की, मुरुड एसटी आगाराला गॅस पंप मिळणे खूप आवश्यक आहे. माझ्या सहकाऱ्यांनी मुरुड आगाराची परस्थिती मला विषद केली असून असंख्य प्रवासीवर्गाचा नाहक वेळ वाया जात आहे. मुरुड आगाराला सीएनजी पंप मिळावा यासाठी सर्व संबंधित अधिकारीवर्गाची तसेच एसटी महामंडळ अधिकारीवर्गाची ४ सप्टेंबर रोजी एक विशेष बैठक आयोजित केली असून येथेच त्यांना मुरुड आगारास गॅस पंप देण्याचे आदेश निर्गमित केले जातील.

याबाबत काही समस्या असतील तर उपस्थित अधिकारी मला सांगतील. त्या समस्यासुद्धा तिथेच सोडवण्यात येऊन मुरुड आगाराला प्राधान्याने गॅस पंप देण्याची कार्यवाही लवकरच पूर्ण करण्यात येईल, असे अभिवचन खासदार तटकरे यांनी दिले.

मुरुड हे प्रसिद्ध पर्यटनस्थळ असून येथे देशी-विदेशी पर्यटक येत असतात. त्याचप्रमाणे स्थानिक नागरिक विविध कामासाठी मुंबई व अन्य ठिकाणी ये-जा करीत असतात. त्यांच्या वेळ प्रवासात वाचणे खूप आवश्यक असल्याने मुरुड आगाराला गॅस पंप मिळण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचेही ते म्हणाले.

मुरुड आगारात गॅस पंप होण्यासाठी खासदार सुनील तटकरे यांनी ४ सप्टेंबर रोजी एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले असून या बैठकीत एसटी मंडळ तसेच अन्य महत्वाचे अधिकारीवर्ग, तेल कंपन्याचे अधिकारी उपस्थित राहणार असून मुरूड आगरामध्ये गॅस पंप त्वरित करण्यात यावा याबाबत ठोस निर्णय होऊन तातडीने अंमलबजावणी होणार असल्याचे मुरुड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे मुरुड आगारात लवकरच गॅस पंप होण्याचा मार्ग लवकरच सुटणार आहे.

# रेवदंड्यातील गौरी डोक्यावर घेऊन नाचण्याची दीडशे वर्षांची परंपरा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

डोक्यावर गौरी घेऊन नाचणे फक्त कसबी नाचणाऱ्यांना शक्य असते. रेवदंड्यात असा पारंपरिक गौरी विसर्जन सोहळा दीडशे वर्षापूर्वीपासून साजरा केला जातो. यात पारनाक्यावरील गौरी नाचविण्याचा कार्यक्रम खास आकर्षण असून अलोट गर्दी या वेळी असते.

रेवदंड्यात दीडशे वर्षापूर्वी सुरू असलेली गौरी नाचविण्याची पारंपरिक प्रथेचे श्रेय राघो महादेव जोशी यांना दिले जाते. रेवदंड्यातील गडमुळे, मोरे, कुंभार, व जोशी कुटुंबियांच्या साजशृंगार केलेल्या गौरी बेंजो, ढोल-ताशेसह वाजत गाजत तालावर डोक्यावर घेऊन नाचविल्या जातात. गणपती विसर्जनासह गौरी विसर्जन सोहळा पार पडतो. त्या वेळी रेवदंडा पारनाका येथील गौरी नाच पाहण्यासाठी पंचक्रोशीतील पै-पाहूणे, चाकरमानींसह स्थानिक मंडळी यांची अलोट गर्दी असते. हा कार्यक्रम गणेश व गौरी भक्तांसाठी खास आकर्षण ठरले आहे.

कोकणच्या संस्कृतीत श्री गणेश उत्सवाला अनन्यसाधारण महत्व आहे. दीड दिवसापासून ते दहा दिवसापर्यंत सुरू असणाऱ्या या आनंदी सोहळयासाठी चाकरमानी गावात दाखल झाले आहेत. यावर्षी गणरायाच्या आगमनानंतर जेष्ठाच्या गौरीचे रविवारी, दि.३१ ऑगस्ट रोजी



आगमन सायकांळी आहे. त्यासाठी माहेरवाशीण गौरीच्या आगमनाची महिलावर्गाकडून तयारी सुरू आहे. यामध्ये काही उभ्या गौरी बसवतात, तर काही एका गौरीचे पूजन करतात. काही तेरडयाची, तर काही खडयांची गौरीची पूजा करतात.

गौरी पूजनाची परंपरा वेगवेगळी असली तरी भक्ताकडून श्रध्देत तीळमात्र कसूर नसते. गौरी घरी आल्यावर उंबरठयावर तिचे पाय धुवून हळद-कुंकू अक्षता लावून घरात आणले जाते. घराच्या कानाकोपऱ्यात तिला दाखविली जाते. काही घरात कुमारिकांच्या हातून गौर आणली जाते, तर काहींकडे घरातील गृहीणी आणते. घरात आल्यावर कुठून आलीस अशी विचारपूस केली जाते. मग सोनपावलांनी आलेल्या गौरीला घरी राहण्याचा आग्रह केला जातो. या वर्षी गणेश उत्सवात सोमवारी, दि. १ सप्टेबर रोजी गौरी पूजनाचा कार्यक्रम आहे.

गौरी पुजनाचे दिवशी ओवसा पूजन तसेच हळदी-कुंकू आयोजित करण्यात येते. कोकणात गौर जागविण्याची प्रथा आहे. त्या दिवशी रात्री महिलावर्गाकडून नाच-गाणी, फुगड्या, सोंगट्या असे खेळ खेळले जातात. गौर म्हणजे पार्वतीचे रूप. काही जण गौरीला बहीण मानून घरी आणतात. विवाहीत महिलेसाठी गौरी म्हणजे माहेरी येण्याचे एक निमित्त असते.

रेवदंड्यात मंगळवार दि. २ सप्टेंबर रोजी सात दिवसाच्या श्री गणेश विसर्जनासह गौरी विसर्जनाचा कार्यक्रम आहे. या दिवशी रेवदंडयातील गडमुळे, मोरे, कुंभार, व जोशी कुटुंबियांच्या सांजशृगांर केलेल्या गौरी बेंजो, ढोल-ताशे, वाजत गाजत तालावर डोक्यावर घेऊन रेवदंडा पारनाका येथे नाचविल्या परंपरेनुसार नाचविल्या जातील, तर हा नाचणारा गौरी सोहळा पहाण्यासाठी अलोट गर्दी रेवदंडा पारनाका येथे होईल.

# गणेशोत्सवात घरोघरी भजनाचे सूर

**माथेरान : प्रतिनिधी**

गणेशोत्सव सुरू झाला असून गणरायासमोर भजनाचा जागर सर्व ठिकाणी होत आहे. छोट्याशा माथेरान शहरात तीन पुरुष भजन मंडळे आणि एक महिला भजन मंडळ कार्यरत आहेत. संपूर्ण गणेशोत्सवात भजनाचा व्यस्त कार्यक्रम सर्वत्र दिसून येत आहे.

माथेरान शहरात गणेशोत्सवामध्ये आजही जुन्या परंपरा कायम असून भजनाच्या निमित्ताने सर्व भक्तांना परमेश्वराच्या चरणी लीन होत नामस्मरण करता येत असल्याने आजही परंपरा कायम आहे. माथेरानच्या मातीत कणाकणात भजनाचा रंग, गंध पसरलेला आहे. गावातील विविध धार्मिक कार्यक्रमात भजनाचा कार्यक्रम नित्यनेमाने मंदिरात होत असतो.



आता गणेशोत्सवाच्या काळात घरोघरी बाप्पा समोर हरीनामाचा गजर करून जागर केला जातो. यामुळे येथील वातावरण या काळात भक्तिमय झालेले दिसत असते.

भजन मंडळींकडून मुख्यतः महिला भजन मंडळींपण तालासुरात भजन गाऊन बाप्पाची मनोभावे आराधना करतात. गणरायासमोर भजन करणे म्हणजे साक्षात भगवंताच्या घरी आराधना करण्यासारखे असल्याचे या महिला सांगतात.

भजनामध्ये चर्मवाद्यांनाही खूप महत्व आहे. चर्मवाद्यांशिवाय भजनातील गोडी अपूर्ण असते. उत्कृष्ट चर्मवाद्याच्या जोरावर मृदंगमणी रसिकांची वाहवा मिळवतात. सर्व कलाकार मिळून बाप्पाची सेवा करीत आहेत.

# पेण नगर परिषदेचे कर्मचारी दिलीप बांधणकर यांचा सत्कार

**पेण : प्रतिनिधी**

पेण नगर परिषद प्रशासनात ३३ वर्षांची प्रदीर्घ सेवा बजावून दिलीप दत्तात्रेय बांधणकर हे ३१ ऑगस्ट रोजी निवृत्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर नगर परिषद अधिकारी, कर्मचारीवर्गाने त्यांचा सेवानिवृत्तीचा सत्कार सोहळा मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सभागृहात संपन्न केला.

या वेळ १९९२ ते २००५ बॅचमधील बांधणकर यांचे सहकारी व अधिकारीवर्गाने त्यांच्या प्रशासनातील उत्तम सेवेचा आणि शांत संयमी स्वभावाचे अनेक पैलू उलगडत त्यांचा गौरव केला.

या सेवापूर्ती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक लेखापाल किरण शहा यांनी



व्यक्त करताना शांत स्वभाव आणि चोख काम करण्याची वृत्ती बांधणकर यांनी शेवटपर्यंत कायम ठेवली, असे गौरविले.

मुख्याधिकारी जीवन पाटील, पाणीपुरवठा विभागाचे रमेश देशमुख, बांधकाम अभियंता सुहास कांबळे, शेखर अभंग यांनी मनोगत व्यक्त करुन बांधणकर यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास उमंग कदम, दयानंद गावंड, विश्वनाथ गायकवाड, अमोल नप्ते, गोविंद भिसे, रमेश देशमुख यांच्यासह बांधणकर कुटुंबीय हजर होते.



पनवेल : सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ सेक्टर ८, ९, १० उलवे नोड येथील शिवाजीनगरचा राजाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दर्शन घेतले. मंडळाकडून त्यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी मंडळाचे अध्यक्ष साईराम ठाकूर, उपाध्यक्ष शिवाजी ठाकूर, भार्गव ठाकूर, वामन ठाकूर, गजानन ठाकूर, शाम कडू, दिनकर साळवी, मारुती घरत, शशिकांत ठाकूर, माने आदी उपस्थित होते.



पनवेल : कुंडेवहाळ ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सदाशिव वास्कर यांच्या गणरायाचे भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी दर्शन घेतले.




पनवेल : माजी नगरसेवक जगदीश गायकर आणि विजय गायकर यांच्या निवासस्थानी स्थानापन्न बाप्पाचे महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी दर्शन घेतले. सोबत भाजप पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव.



खोपोलीचा राजा, झेनिथ कॉर्नर



योगेश मुकादम, शिरढोण, ता. पनवेल



मिलिंद मारुती जोशी, शहाड, कल्याण



पत्रकार संतोष खाडे, माथेरान



अर्थव घरत, केळवणे, ता. पनवेल



मिलिंद कल्याणकर, नेरूळ, नवी मुंबई



इंद्रप्रस्थचा राजा, नेरूळ, नवी मुंबई



ॲड. प्रसाद धारिया, कुंबळे, माणगाव



डॉ. मयुर राज कल्याणी, मुरूड



सचिन गोरेगावकर, माणगाव



पत्रकार दिनेश पवार, उरण



नागोठणे : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी सरपंच विलास चौलकर यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, प्रियांका पिंपळे, संज्योती लाड यांनी दर्शन घेतले. सोबत श्वेता चौलकर व स्वप्नाली चौलकर. दुसऱ्या छायाचित्रात भाजप रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड यांच्या निवासस्थानी स्थानापन्न बाप्पा, तर पत्रकार सुनील कोकळे यांच्या गणपतीचे भाजप नेते किशोर म्हात्रे व पत्रकार शामकांत नेरपगार यांनी घेतलेले दर्शन तिसऱ्या छायाचित्रात.



कोहिनूर मित्र मंडळ, महाड



सुरज पाटील, शिवनगर, रसायनी



माजी सरपंच महेंद्र पाटील, पारगाव, ता. पनवेल



शुभ पाटील, खारघर



उद्योजक अनंत नाथा माळी, केळवणे, ता. पनवेल


भावपूर्ण श्रध्दांजली



बाबा म्हणजेः
श्रमांचं दुसरं नाव, पण चेहऱ्यावर कायम हसू,
कधीही परिस्थितीने हरवू न दिलेलं मनोबल.
कितीही थकलं तरी आमच्यासाठी नेहमी तयार.
त्यांची विनोदबुद्धी - घरात सतत हास्याचा
शिडकाव करत असे. आणि त्यांचं संगीतप्रेम घरात
सतत सूर नांदत. गाणं म्हणजे त्यांचं दुसरं आयुष्य,
आणि आम्ही त्यांचं पहिलं. प्रत्येक परिस्थितीत
त्यांनी स्वतःला बदलून घेतलं. पण कधीही
आपल्या मूळ स्वभावाचा त्याग केला नाही. ते
'HAPPY-GO-LUCKY' होते आयुष्याला हलकं
घेत. पण जबाबदाऱ्या फारच गंभीरतेनं निभावणारे.
कुटुंबासाठी त्यांनी आयुष्यभर झटत राहिलं,
म्हणूनच आजही ते घराच्या प्रत्येक कोपऱ्यात
आहेत आठवणीत. शब्दांत. आणि सूरांत.

कै. श्री. सुरेश केशव ठाकूर

यांच मंगळवार दि.२६/०८/२०२५ रोजी दुःखद निधन झाले आहे.
त्यांचे आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वर चरणी प्रार्थना.

भजन सेवा
रोज संध्याकाळी ०५ ते ०७ वा.

होम विधी
शुक्रवार
दि. २९/०८/२०२५ रोजी
सकाळी ०९.०० वा.

दशक्रिया विधी
गुरूवार
दि. ०४/०९/२०२५ रोजी
सकाळी ०८.३० वा.
श्री क्षेत्र नाशिक येथे होणार आहे.

उत्तरकार्य
रविवार
दि.०७/०९/२०२५ रोजी
दु. १२.०० वा.राहत्या घरी
शिवाजीनगर येथे होणार आहे.

कुणीही कुठल्याही प्रकारचे दुखवटे आणू नये.

शोकाकुल -समस्त ठाकूर परिवार (शिवाजीनगर)


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com